|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : ८ सोमवार दि. १२ फेब्रुवारी २०२४ ते रविवार दि. १८ फेब्रुवारी २०२४ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## निरपराध तरुण संशयचा बळी ठरला चोर समजून त्याला विनाकारण मारला

भाईंदर/क्राईम रिपोर्टर

मोब लिंचींगचे प्रकार भयंकर असतात. आजवर अनेक निरपराधांना यात जीव गमवावा लागला आहे. भाईंदरमध्ये अशाच एका घटनेत चोर समजून एका निरपराध इसमाला ठार मारण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी चार पैकी ३ आरोपींना अटक केली आहे. तर एक फरारी असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

भाईंदरमध्ये चोर असल्याच्या संशयाने केलेल्या मारहाणीत २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. खारी लगाव येथील औद्योगिक वसाहती येथे ही घटना घडली. ...पान २ वर

## आई-बहिणीवरच्या शिव्या ऐकून खूप वाईट वाटले ग्राहकाने लॉजवाल्याची हत्या करून गुप्तांग छाटले

रायगड (पेण)/क्राईम रिपोर्टर



रागाला डोळे नसतात असे म्हटले जाते ते काही खोटे नाही. एखाद्या माणसाच्या मनात जर कोणाविरुद्ध राग असेल आणि त्यातून त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण झाली, तर सुडाची आग त्याला स्वस्थ बसू देत नाही. तर काही माणसे शीघ्रकोपी असतात. अशा माणसांमध्ये कधी कधी विकृती निर्माण होते. आणि हि विकृती त्यांच्या कृतीतून दिसून येते. गुन्हेगारी घटनांच्या इतिहासात मुंडके छाटून झालेल्या हत्या किंवा शरीराचे इतर अवयव छाटून केलेल्या हत्या या सगळ्या विकृतीच होत्या. त्यामुळे अशा विकृत गुन्हेगारांना बऱ्याच गुन्ह्यांमध्ये फाशीची शिक्षा झालेली आहे. मात्र अशा गुन्हेगारांची मानसिकता पाहता, त्यांच्या मनात जी सुडाची भावना निर्माण झालेली असते त्याला कारणही तितकेच भयंकर असते. कारण कोणताही माणूस एखाद्याचा इतक्या वाईट पद्धतीने खून करीत नाही. ज्या माणसाची त्याने निर्घुणपणे हत्या केलेली असते, तो मयत इसमही त्याच्याशी अत्यंत वाईट वागलेलला असतो. त्यामुळे त्यालाही तितक्याच निष्ठुरपणे शिक्षा देण्याची भावना त्याच्या मनात असते. आणि त्यातूनच अवयव कापून खून करण्यासारख्या विकृती माणसात निर्माण होतात. रायगड जिल्ह्यातील वडखळ येथे अशीच एक अंगावर शहारे आणणारी हत्या घडली आहे. चंद्रजीत नावाचा तरुण प्रेयसीला लॉजवर घेऊन गेला होता. मात्र पैशावरून लॉजचा व्यवस्थापक आणि त्या चंद्रजीत यांच्यामध्ये वाद झाला. यावेळी लॉजच्या व्यवस्थापकाने त्या चंद्रजीतला आई बहिणीवरून अत्यंत घाणेरड्या शिव्या दिल्या. तसेच त्याच्या प्रेयसीवरही घाणेरड्या कॉमेंट्स केल्या. या गोष्टीचा चंद्रजीत याला इतका संताप आला कि त्याने लॉजचा व्यवस्थापक धर्मेंद्र कुशवाह याची अत्यंत निर्घुणपणे हत्या. केली तो एवढ्यावरच थांबला नाही तर त्याने कुशवाहचे गुप्तांग छाटून त्याच्या डोळ्यावर ठेवले. या अमानुष हत्येने संपूर्ण पेण तालुका हादरून गेला आहे. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपी त्याची प्रेयसी व साथीदाराला अटक केली आहे.




पेण तालुक्यातील वडखळमध्ये असलेल्या सावली लॉजमध्ये त्याच लॉजचा व्यवस्थापक धर्मेंद्र कुशवाह याचा रक्तबंबाळ अवस्थेतील मृतदेह सापडला होता. कुशवाहची धारदार हत्याराने गळा चिरून हत्या करण्यात आली होती. आणि सर्वात भयंकर म्हणजे त्याचे गुप्तांग छाटून त्याच्या डोळ्यावर ठेवण्यात आले होते. मृतदेहाचे हे विद्रुपीकरण पाहून पोलीसही हादरून गेले होते. मात्र पोलिसांनी वेगवान हालचाल करून या प्रकरणाचा छडा लावला आणि चंद्रजीत झान्कुराम भारद्वाज (३०), हरिशंकर लालचंद राजभर आणि राणी सरोज चव्हाण या तिघांना अटक केली. या तिघांनी जे चौकशीत सांगितले ते हादरवून टाकणारे होते. चंद्रजीत हा सुतारकाम करायचा. तसेच तो ड्रायव्हरही होता. राणी चव्हाण हि त्याची प्रेयसी आहे. ५ फेब्रुवारीला तिला वडखळ मधील सावली लॉजवर नेले. मात्र त्याच्याकडे पैसे कमी होते. त्यावरून लॉजचा व्यावस्थापक धर्मेंद्र कुशवाह याच्याशी त्याचे भांडण झाले. यावेळी कुशवाह याने चंद्रजीतला आई-बहिणीवरून खास करून बहिणीवरून अत्यंत घाणेरड्या शिव्या दिल्या. चंद्रजीत याला बहिणीनेच सांभाळलेले असल्याने बहिणीवरून दिलेल्या शिव्या त्याला सहन नाही झाल्या नाहीत तसेच त्याची प्रेयसी राणी बद्दलही त्याने अपशब्द वापरले. त्यामुळे चंद्रजीतच्या संतापाचा कडेलोट झाला आणि त्याच रात्री त्याने आपला मित्र हरिशंकर राजभर, प्रेयसी राणी चव्हाण यांच्या मदतीने धर्मेंद्र कुशवाह याची अत्यंत अमानुषपणे हत्या केली. कुशवाह याच्यावर चंद्रजीतचा ...पान २ वर

## प्रेमविवाहाची शोकांतिका झाली दारुड्या पतीने पत्नीची हत्या केली




मुंबई/क्राईम रिपोर्टर

**कोणत्याही व्यक्तीची संपूर्ण माहिती घेतल्याशिवाय त्याच्याशी मैत्री करणे किंवा नंतर विवाह करण्याचा निर्णय घेणे चीकीचे ठरू शकते. फेसबुकवर ओळख होवून मैत्री झालेल्या एका ओरिसातील तरुणीने मुंबईतील तरुणाशी लग्न केले. मात्र त्याला दारूचे ब्यासन होते हे तिला ठावूक नव्हते. त्यामुळे लग्नानंतर त्यांच्यात भांडणे होऊ लागली ती त्याला दारू पिण्यास विरोध करू लागली. त्यामुळे चिडलेल्या पतीने रागाच्या भरात तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

मुंबईच्या कांजूरमार्ग येथे दारू पिण्यास विरोध केला म्हणून पत्नीची हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अट केली आहे. मृत महिला आणि आरोपीची सोशल मीडियाद्वारे ओळख झाली होती. त्यानंतर ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले आणि गेल्या सहा महिन्यापूर्वी दोघांनी एकमेकाशी लग्न केले. परंतु, आरोपीला दारूचे व्यसन असल्यामुळे त्यांच्यात वारंवार वाद होत असे, अशी माहिती पोलिसांना मिळाली. राजेश यादव असे पत्नीची हत्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर, दीपा यादव (वय २२) असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. मंगळवारी कांजूर मार्गावरील झोपडपट्टीत दुर्गंधी येत असल्याची तक्रार पोलिसांना मिळाली. नंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि दरवाजा तोडून महिला बेडशीटमध्ये गुंडाळलेली आढळली. महिलेचा मृतदेह सापडला असून तो शवविच्छेदनासाठी जवळच्या शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला,जिथे महिलेची हत्या झाल्याची पुष्टी झाली. राजेश गायब असल्याने पोलिसांना त्याच्यावर संशय आला. त्यानंतर पोलिसांनी राजेशचे लोकेशन ट्रेस करत त्याला उत्तर प्रदेशच्या गाझीपूर येथून ताब्यात घेतले. पोलिसांनी राजेशची कसून चौकशी केली असता त्यानेच पत्नीची हत्या केल्याची कबूली दिली. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राजेश आणि मृत महिला दीपा यांची ...पान २ वर

## अनैतिक संबंधाचा भयंकर शेवट झाला प्रेयसीच्या भावाने प्रियकराचा गेम केला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



**कोणताही भावू आपल्या बहिणीचे दुसऱ्याशी अनैतिक संबंध आहेत हे सहन करू शकत नाही. इचलकरजीतील मयूर कांबळे याचे त्याचा मित्र विनायक चोगले याच्या चुलत बहिणीशी अनैतिकसंबंध होते. विनायकने अनेकवेळा मयूरला माझ्या बहिणीचा नाद सोड असे सांगितले, पण मयूर एकत नव्हता. त्यामुळे विनायकने आपल्या अल्पवयीन भाच्याच्या मदतीने मयूरची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

इचलकरंजी शहराचा यंत्रमाग धंद्याने विस्तार वाढला तसे तसे शहराच्या आजबाजुची खेडी ही बाहेरील लोकांनी भरून गेली. इचलकरंजी शहरा लगत असणारे तारदाळ हे गाव देखील त्याला अपवाद राहिले नाही.तारदाळ मधील जावाईवाडी येथे तर बाहेरून कामासाठी आलेले लोक येथे स्थाईक झाले. तारदाळ येथील जावाईवाडी येथील मयुर कांबळे याचे गल्लीतीलच एका विवाहित महिलेशी प्रेमसंबंध असल्याची चर्चा गेल्या अनेक दिवसापासून होत होती. ती विवाहित महिला ही आपल्या नवऱ्याला सोडून आपल्या माहेरी राहत होती. वयाच्या ३० शीतील ती ...पान २ वर

## दलित मुलीशी लग्नाचा केला विचार 'सैराट' बापानेच मुलाला केले ठार


अकोला/क्राईम रिपोर्टर


**महाराष्ट्र सारख्या सामाजिक दृष्ट्या प्रगत राज्यात आजही जात-पात मानली जाते त्यातूनच आंतरजातीय विवाहाला विरोध केला जातो आणि हा विरोध मोडून काढण्याचा प्रयत्न केल्यास सैराट सारख्या घटना घडतात अकोला जिल्ह्याच्या टीटवा गावात अशीच एक घटना समोर आली आहे. उच्च जातीतल्या मुलाने दलित मुलीशी लग्न करण्याचा निर्णय घेतल्यामुळे बापाने व भावाने त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**



दलित समाजाच्या मुलीवर प्रेम केल्याच्या कारणावरून संतप्त वडिलांनीच आपल्या पोटच्या मुलाची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार अकोला जिल्ह्यात पोलीस तपासात उघडकीस आला. दुसऱ्या मुलाच्या मदतीने वडिलांनी मुलाचा गळा आवळून जीव घेतला. घटनेनंतर संपूर्ण कुटुंब बाहेरगावी प्रसार होऊन मुलाला कोणी तरी मारल्याचा बनाव रचला होता. पोलीस तपासात मात्र सत्य समोर आले. संदीप नागोराव गावंडे (२६) असे मृताचे, तर नागोराव कर्णाजी गावंडे असे आरोपी वडिलांचे नाव आहे. जिल्ह्याच्या बार्शीटाकळी तालुक्यातील टिटवा गावात नागोराव गावंडे त्यांच्या कुटुंबासह राहत होते. त्यांचा मुलगा संदीप हा पुण्यातील एका कंपनीत कामाला होता. संदीपचे गावातील एका अनुसूचित जातीच्या कुटुंबातील मुलीशी प्रेम होते. त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांचे प्रेम संबंध वडिलांना मान्य नव्हते. ...पान २ वर

## वहिनीला बदनाम करण्याची धमकी दिली अखेर दोन मुलांसह तिने आत्महत्या केली





निफाड/क्राईम रिपोर्टर

**उंबरठ्याच्या बाहेर महिला असुरक्षित असू शकतात. पण उंबरठ्याच्या आत कुटुंबातील पुरुषांकडूनच जेंव्हा महिलांकडे वाईट नजरेने पहिले जाते. तेंव्हा मात्र त्या महिलेला जगणे अशक्य होते. निफाड तालुक्यातील शिवापूर शेळकेवाडी यथे दिराचीच वाहिनीवर वाईट नजर होती. तो तिला शरीरसुखासाठी धमकावत होता. इंस्टाग्रामवरून बदनामीची धमकी देत होता. अखेर नाईलाजाने त्या महिलेने आपल्या दोन मुलांसह आत्महत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दिराला अटक केली आहे.**

शिवापूर (शेळकेवाडी) ता. निफाड येथील विवाहित महिला दोन मुलांसह दि.५ फेब्रुवारी पासून बेपत्ता होती. याबाबत लासलगाव पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल होती. ...पान २ वर

## उधारीच्या वसुलीसाठी दारूवाला संतापाने पेटला ५० रुपयांसाठी त्याने दारुड्याचा जीव घेतला

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर



मयत गावजी जाधव

**दारूचे व्यसन असलेल्या माणसाला रोज दारू लागते. पण दारूसाठी रोजच खिशात पैसे असतात असे नाही. मग कधी कधी उधारी ठेवावी लागते. मात्र उधारीचे पैसे वेळेवर चुकवले नाहीत तर दारूच्या धंदेवाल्याचा मारही खावा लागतो. राहुरी तालुक्यातील केदलमध्ये अशाच एका घटनेत दारूच्या धंदे वाल्याची एका ग्राहकाकडे फक्त ५० रुपये उधारी होती. मात्र तो ती उधारी चुकवत नव्हता. त्यामुळे चिडलेल्या दारूवाल्याने एके दिवशी ५० रुपयांच्या वसुलीसाठी ग्राहकाला इतके बेदम मारले कि त्यात ग्राहकाचा मृत्यू झाला. या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.**



आरोपी रायभान

अहमदनगर जिल्ह्याच्या राहुरी तालुक्यातील पूर्वेकडीलबाजूस नदीकाठी वसलेले केंदळ खुर्द हे एक हजार-बाराशेची लोकसंख्या असलेले छोटेसे गाव. बागायत शेती असल्याने येथे शेतकऱ्यांचेमोठे प्रस्थ आहे, त्यामुळे बरीचशीफिरस्ती मंडळी शेतकऱ्यांच्या शेतावर मोलमजुरी करून आपली गुजराण करतातातर काही जणवेगवेगळा धंदा-व्यवसाय करतात. काही जण बांधकामावर सेंट्रींग तसेच इतर कामे करतात. केंदळ खुर्द गावात चाळीशी ओलांडलेला गवजी बन्सी जाधव हा गृहस्थ आपल्या कुटुंबासमवेत रहात होता. गवजीच्या कुटुंबात पत्नी जया (वय ३९), दोन मुले सागर, ओम, मुलगी निलम, सासू धोंडाबाई असे सदस्य रहातात. गवजी स्वतः बांधकाम कंत्राटदाराच्या कामावर स्लॅबचे काम करतो, तर त्याची बायको शेतकऱ्याच्या शेतावर गवत खुरपायच्या कामाला जाते. गवजीला स्लॅबचे काम करता-करता जोडीदारांमुळे ...पान २ वर

## वकील दांपत्याचे काय सांगा चुकले खंडणीसाठी दोघेही जीवाला मुकले

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर




**सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची सुरक्षा खूप महत्वाची असते. पण दुर्दैवाने या क्षेत्रातील लोकांचे जीवन राम भरोसे आहे. वकील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, आरटीआय कार्यकर्ते यांच्या सुरक्षेबाबत अजून पर्यंत सरकारने ठोस उपाय योजना केलेल्या नाहीत. म्हणून तर राहुरी न्यायालयात काम करणाऱ्या एका वकील पती पत्नीची ५ लाखांच्या खंडणीसाठी हत्या करण्यात आली. या प्रकरणी वकील संघटना आक्रमक झाल्या असून त्यांनी अधिवक्ता संरक्षण कायदा लागू करण्याची मागणी केली आहे.**

राहुरी येथील न्यायालयात प्रॅक्टीस करणारे राजाराम आढाव आणि त्यांची पत्नी मनीषा आढाव या वकील दाम्पत्याचे त्यांच्या किरण दुशिंग या खून, जबरी चोरी, घरफोडी, खंडणी, आर्म्स ॲक्ट अशा गंभीर स्वरुपाचे १२ गुन्हे दाखल असलेल्या एका पक्षकाराने त्याच्या इतर ४ सहकाऱ्यांसोबत अपहरण करून हत्या केल्याची दुखद व धक्कादायक घटना समोर आली आहे. यामुळे राज्यभरातील वकील वर्गात रोषाचे वातावरण आहे. किरण दुशिंग याने ...पान २ वर

## दारूसाठी पैसे देण्यास नकार दिला चिडलेल्या मित्राने मित्राचा खून केला

नागपूर/क्राईम रिपोर्टर



**गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक हे प्रामुख्याने व्यसनी असतात. बहुतेकांना बाई-बाटली आणि जुगाराचे व्यसन असते. त्यामुळे अशा लोकांशी मैत्री करणे धोक्याचे असते. सट्टेबाजीच्या व्यवसायात असलेल्या राहुलची मंगेश बरोबर मैत्री होती. शुक्रवारी राहुल मंगेशच्या घरी गेला व त्याने मंगेश्कडे दारूसाठी पैसे मागितले. पण मंगेशने पैसे दिले नाहीत. त्यामुळे चिडलेल्या राहुलने मंगेशची हत्या केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

नागपूरात नवीन पोलीस आयुक्त आल्यानंतर दोन हत्येची घटना घडली आहे. त्यामुळे अशा परीस्थितीत पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंघल यांच्यापुढे नवे आव्हान निर्माण झाले आहे. वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुरुवारी रात्री झालेल्या दुहेरी हत्येला २४ तास उलटत नाही तर काल शुक्रवारी रात्री शहरात आणखी एका हत्येची घटना घडली आहे. शहरातील कपिलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने आरोपीने एका व्यक्तीची हत्या केली. मंगेश गणेश मेंढे (४५, उन्नती कॉलनी, समतानगर) असं हत्या झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. तर दत्तू उर्फ राहुल रमेश रामटेके (१९, मानवनगर, टेकनाका) असं आरोपीचं नाव आहे. मृतक मंगेश मेंढे हा वाळूचा व्यवसाय करायचा. तसेचअवैध सट्टेबाजीही करायचा. आरोपी राहुलसोबत तो देखील गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. मृतक मंगेश आणि आरोपी यांच्यात मैत्री होती. शुक्रवारी रात्री आरोपी राहुल मंगेशच्या घरी पोहोचला असता त्याने त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला आधी घराबाहेर आणले. त्यानंतर दोघे टेकानाक्याजवळ आले. दरम्यान, आरोपी राहुलने मंगेशकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. मात्र, मंगेशने पैसे देण्यास नकार दिला. याचा राग मनात धरून आरोपी राहुलने रस्त्याच्या ...पान २ वर

# नालासोपाऱ्यात भर रस्त्यात तरुणीवर चाकू हल्ला; प्रेमसंबंध तोडल्याचा रागात केले कृत्य!

**नालासोपारा/प्रतिनिधी**



नालासोपाऱ्यात २२ वर्षीय तरुणीवर चाकू हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात तरुणी बचावली असून आचोळे पोलिसांनी फरार झालेल्या हल्लेखोर तरुणाला अटक केली आहे. मंगळवारी सकाळी हेमांगी सुरती (२२) ही तरुणी नालासोपारा पूर्वेच्या फुल बाजाराजवळून रेल्वे स्थानकाच्या दिशेने जात होती. यावेळी विकास वर्मा (२३) नावाच्या तरुणाने तिला रस्त्यात अडवले. माझ्याशी बोलत का नाही? प्रेमसंबंध का ठेवत नाही? असे बोलून तिच्या पोटावर आणि छातीवर चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली. हल्ल्यानंतर तरुण पसार झाला होता. नागरिकंनी तरुणीला नालासोपारा येथील स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तिने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी हल्लेखोर तरुण विकास वर्मा याला अटक केली आहे. आरोपी विकास हा बेरोजगार आहे. मात्र पीडित तरुणीने त्याच्याशी असलेले प्रेमसंबंध तोडले होते. त्यामुले तो तिच्या मागे लागला होता. त्या रागातून त्याने हा हल्ला केल्याची माहिती आचोळे पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक रेखा पाटील यांनी दिली. आरोपी वर्मा याला तीन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. जखमी तरुणीला बुधवारी रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे.

# वसईत अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात पद्मश्री भाऊसाहेब वर्तक यांच्या ११0व्या जयंतीनिमित्त ग्रंथालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**वसई/प्रतिनिधी**



पद्मश्री भाऊसाहेब वर्तक यांच्या ११० व्या जयंतीनिमित्त अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पद्मश्री भाऊसाहेब वर्तक यांचा शैक्षणिक व सामाजिक कल्याणाचा वारसा साजरा करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक उत्कृष्टता वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

स्पर्धात्मक आणि प्रवेश परीक्षांची तयारी करणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयातील स्पर्धा व प्रवेश परीक्षासाठी उपलब्ध ग्रंथांचे प्रदर्शन हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. तसेच विद्यार्थ्यासाठी ग्रंथालयात मुक्तद्वार दिवसाचे आयोजन करण्यात आले होते यामुळे विद्यार्थ्यांना विविध विषय आणि विषयांवरील पुस्तकांच्या वैविध्यपूर्ण संग्रहाचा शोध घेण्याची आणि त्यांची ओळख करून घेण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक ज्ञान आणि कौशल्ये वाढवण्यासाठी वाचन आणि संशोधनात गुंतण्यासाठी प्रोत्साहित करणे हा त्याचा उद्देश आहे. या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी चांगला प्रतिसाद दिला,ज्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आणि शैक्षणिक कामगिरी उचावण्याची भावना वाढीस लागेल असे ग्रंथालय प्रमुख डॉ. अजय कांबळे यांनी सांगितले. अशा प्रकारचे उपक्रम शिक्षणासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यात आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी सक्षम बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून दि. १८ जानेवारी ते २४ जानेवारी २०२४ या कालावधीत पार पडलेल्या ग्रंथालय सप्ताहामधील ग्रंथशोध व प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे, उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. हिरानंद खंबायत, ग्रंथालयीन कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहाय्यक ग्रंथपाल श्री. कृपाल शिंदे यांनी केले तर आभारप्रदर्शन ग्रंथालय प्रमुख डॉ. अजय कांबळे यांनी केले.

पान १ वरून...

## आई-बहिणीवरच्या शिव्या ऐकून ...

इतका राग होता कि त्याने त्याचे गुप्तांग कापून त्याच्या डोळ्यावर ठेवले आणि तेथून पोबारा केला. दुसऱ्या दिवशी हे भयंकर हत्याकांड उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांनी तातडीने सीसीटीव्ही फुटेज व इतर माहितीच्या आधारे तिन्ही आरोपींना अटक केली. या प्रकरणी वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी पांढरे अधिक तपास करीत आहेत.

## निरपराध तरुण संशयचा बळी ...

याप्रकरणी चार जणांना नवघर पोलिसांनी अटक केली असून एक आरोपी फरार आहे. सोमवारी सायंकाळी भाईंदरच्या खारीगावातील भाजीबाजारा जवळ असलेल्या एका नाल्यात एका तरुणाचा मृतदेह आढळून आला होता. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हाची नोंद करण्यात आली होती. त्यानुसार सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने शोध मोहीम राबवून पोलिसांनी अवघ्या सहा तासात चार आरोपीना मुंबई येथून पळून जात असताना ताब्यात घेतले. मात्र यातील एक जण पळून जाण्यास यशस्वी ठरला.चोरीच्या संशया वरून बेदम मारहाण केल्याने तरुणाचा मृत्यू झाला असल्याची कबुली आरोपीनी दिली असल्याची माहिती नवघर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी यांनी दिली.

## प्रेमविवाहाची शोकांतिका झाली...

फेसबूकवर भेट झाली होती. यानंतर दोघेही एकमेकांशी बोलू लागले. तिथून दोघांमध्ये नंबरची देवाणघेवाण झाली. या संवादाचे रुपांतर हळूहळू प्रेमात झाले आणि गेल्या सहा महिन्यापूर्वी दोघांनी लग्न केले. राजेशसोबत लग्न करण्यासाठी दीपा ओरिसातून मुंबईत आली होती. मात्र, राजेशला दारूचे व्यसन असल्याचे तिला माहिती नव्हती. ज्यामुळे दोघांमध्ये दररोज वाद होऊ लागले. काही दिवसांपूर्वी दारु पिण्यावरून पुन्हा दोघांमध्ये भांडण झाले. मात्र, यावेळी भांडणानंतर राजेशने दीपाची हत्या केली.

## अनैतिक संबंधाचा भयंकर शेवट झाला ...

नवऱ्याच्या त्या सुखापासून दुर राहिली असल्याने कळत नळकतपणे ती मयुरला चिकटली. ते दोघे ही बाहेर भेटत होते. मयुर याचा मित्र विनायक चौगले हा ही जावाईवाडी येथेच राहयला आहे. तो इचलकरंजी शहरातील रावण गॅगशी संबंधीत होता. तो रावण टोळीचा सक्रीय गुन्हेगार असल्याने जावाईवाडी आणि तारदाळ परिसरात त्याची दशहत होती.विनायक आणि मयुर हे दोघे ही चांगले जवळचे मित्र असल्याने दोघे ही दारू प्यायला एकत्र बसत होते. सुरूवातीला त्या दोघांत कोणताही आडपडदा नव्हता. परंतु मयुर हा आपल्या चुलत बहिणीबरोबर आहे. त्याचे आणि तिचे संबंध आहेत. हे ज्यावेळी विनायकला समजले त्यावेळी त्याच्या तळपायाची आग मस्कात गेली.दारूच्या पार्टीत त्याने एकदा दोनदा मयुरला समजावून सांगून माझ्या बहिणीला नादाला लावू नकोस असे सांगितले तरी ही मयुर काही त्याचे ऐकत नव्हता.तो आपल्या प्रियेसीला बाहेर भेटत होता. तिच्याबरोबर मजा मारत होता. त्यामुळे विनायक चौगले हा त्याचेवर चिडून होता. मयुर आपला मित्र असून त्याने आपल्या बहिणीला नादाला लावले असून त्याच्यामुळे आपल्या समाजात बदनामी होत आहे.त्यातच त्याच्या बहिणीने नवऱ्याला सोडून मयुरला जवळ केल्याने हल्ली दोघात या कारणावरून सारखी भांडणे होत होती.

मयुर कांबळे, विनायक चौगले हे सर्व जण चांभार महार जातीचे असल्याने मयुरला त्यात काही वावगे वाटत नव्हते. परंतु मयुर हा फक्त तिचा कामापुरता वापर करून घेत असल्याने विनायक हा त्याला तिच्यापासून लांब राह तु तिचा नाद सोड म्हणून सांगत होता पण मयुर काही कोणाचे एक ऐकत नव्हता. त्या दोघांचे प्रेमप्रकरण हे गेल्या दोन वर्षापासून सुरू होते. त्यात कोणताही खंड नव्हता. ती विवाहिता ही मयुरने बोलविले की कोणाला काही न जुमानता त्याला भेटायला येत होते. त्याचे प्रेमप्रकरण आणि संबंध हे फारच पुढे गेल्याचे विनायकला कळून चुकले. त्यातच ते दोघे ही मागे एकदा त्याला घरात नको त्या अवस्थेत सापडले होते. त्यामुळे त्याच्या रागाचा पारा जास्तच चढला होता. काही करून मयुरला आता अवारायला पाहिजे याचा त्याने विचार केला. तसे त्याने ही गोष्ट आपला भाचा अंकुश माने आणि त्याच्या मित्राला ही सांगितली. अकुंशला तर आपल्या आईचा राग येत होता. तो जरी अल्पवयीन असला तरी त्याला सगळे कळत होते. आईच्या बेलगाम वागण्याने तो ही वैतागलेला होता. चुलत मामा विनायकने मयुरचा मायमाचा काटा काढयाचा आहे हे त्याला ज्यावेळी सांगितले त्यावेळी तो एका पायावर तयार झाला. शनिवार दि.३ फेब्रुवारी रोजी रात्री ८च्या दरम्यान मयुर कांबळे आणि त्याचा मित्र स्वप्नील वराळे हे दोघे सांगली रोडवरील यड्राव फाटयावरील एका बारमध्ये दारू पित बसले होते. त्यावेळी अचानक तेथे विनायक चौगले हा आपला भाचा अंकुश माने आणि त्याच्या मित्राबरोबर दारू प्यायला तेथे आले. ते तिघे ही मयुरच्या टेबलवरच बसले. मयुरला आणि स्वप्नीलला दारूची नशा जास्त चढली होती.दारूच्या नशेत ते दोघे ही काही ही बडबडत होते. विनायक तेथे आल्यावर मयुरने त्याला ही एक क्वाटर सांगितली. सगळ्यांनी मिळून आपल्या घशाखाली दारू रिचवली.मयुर आणि स्वप्नील हे दोघे एका बाईकवरून तारदाळकडे जायला निघाले. त्याच्या मागे विनायक आणि अंकुश व त्याचा मित्र एका बाईकवरून निघाले. त्यांनी मयुरला तारदाळ खोतवाडी रोडवरील आरोही बार शेजारी थांबवले. त्यावेळी विनायकने मयुरला मला आणखीन एक क्वाटर पाहिजे असे त्याला सांगितले. त्यावेळी मयुर त्याला म्हणाला माझ्याकडे आता पैसे नाहीत याचा राग विनायकला आला. त्यातच विनायकने बारच्या बाहेर रस्त्यावर उभे राहून मयुरला तुला किती वेळा सांगायचे की माझ्या बहिणीबरोबर संबंध ठेवू नकोस असे म्हणत त्याची गंचांडी पकडली. दोघात हाणामारी सरु झाल्यावर अंकुश याने ही मयुरला लाथा बुक्कयाने मारायला सुरूवात केली. हे बघून मयुरचा मित्र स्वप्नील वराळे हा त्याला सोडवायला पुढे आला. त्यावेळी विनायकने त्याला धमकावत तु इथून नीट जा. नाही तर तुझे काही खरे नाही असे म्हटले. त्यावेळी स्वप्नीला हा पुढे तसाच जावू लागला. बहिणीबरोबरचे संबंध तोडत नाही म्हणून विनायकने आपल्याकडील तलवार काढली आणि त्या तलवारने मयुरच्या डोक्यावर, पाठीवर, चेहऱ्यावर, मानेवर सपासप असे २२ ते २५ वार केले. मयुरच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. तो आपला जीव वाचविण्यासाठी उठून पळून जावू लागला. बार पासून सुमारे ३०० मीटर पर्यत तो पळाला. पळून जाणाऱ्या मयुरला अंकुश आणि त्याच्या मित्राने गाठले. त्याचेवर परत आपल्याकडील चाकूने वार केला.विनायकला दारूची नशा जास्त झाल्याने त्याने परत तलवारीने मयुरच्या डोक्यात वार केले. तो वार इतका वर्मी होता की विनायक त्याचेवर वार करीत असताना त्याच्या हाताची बोटे तुटून पडली.एवढयात दोघा अल्पवयीन मित्रांनी मयुरच्या डोक्यात दगड घालून त्याचा खेळ खल्लास केला. हे बघून पळून गेलेला स्वप्नील वराळे हा घटनास्थळाकडे परत आला. त्याने परत जावून जावाई येथे मयुरच्या घरच्या लोकांना सांगितली. इकडे घटनास्थळावरून विनायक चौगले हा आपली बोटे तुटल्याने पळून गेला. तसेच दोन्ही अल्पवयीन मुले ही पळून गेली. पळून गेलेला विनायक चौगुले हा आपल्या बोटावरील उपचारासाठी कोल्हापूर येथील एका खाजगी दवाखान्यात दाखल झाला. इकडे आरोही बारच्या समोर मयुर कांबळे याचा खून झाल्याची बातमी जावाईवाडीत पसरली. मयुरच्या घरच्या आणि शेजारच्या लोकांनी घटनास्थळी धाव घेऊन एकच गर्दी केली. कुणी तरी या घटनेची माहिती शहापुर पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात मयुर कांबळे याचा मृतदेह छिन्नविच्छन्न अवस्थेत पालथा पडला होता. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी इचलकरंजी येथील आयजीएम रुग्णालयात पाठवला. आयजीएम रुग्णालयात मयत मयुर कांबळे याच्या नातेवाईकांनी आणि मित्रमंडळीनी एकच गर्दी केली. मयुर कांबळे याचा खून विवाहबाहय संबंधातून झाल्याची माहिती शहापुर पोलीसांना मिळाल्यावर पळुन गेलेल्या संशयीत आरोपीचा शोध घेत असताना त्या दोघांनाही पोलीसांनी जावाईवाडीतील त्याच्या घरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता मयुर कांबळे याचा खून अंकुश माने याच्या आई बरोबर असलेल्या त्या संबंधातून केला असल्याची माहिती त्यांनी दिली.

या घटनेतील मुख्य संशयीत विनायक चौगुले हा रावण गॅगशी संबंधीत असल्याने त्याचेवर पोलीस ठाण्यात अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पुढे आले. त्याच्यावरील उपाचरानंतर त्याला ताब्यात घेण्यात येईल असे पोलीसांनी सांगितले. या घटनेची लेखी फिर्याद मयत मयुर कांबळे याचा मित्र स्वप्नील बाबुराव वराळे (वय ३६) रा.जावाईवाडी तारदाळ याने शहापुर पोलीसात दिल्याने शहापुर पोलीसांनी मयुर दीपक कांबळे (वय २४) याच्या खून प्रकरणी विनायक चौगुले. (वय २५) आणि दोघा अल्पवयीन मुलाच्या विरोधात गु,रजि.नं.५३/२०२४ भा.दं.वी. कलम सह कलम ३०२,५०६,३४ सह गुन्हा दाखल केला. पोलीसांनी या घटनेतील दोघा अल्पवयीन मुलांना कोर्टासमोर हजर केले असता कोर्टाने त्याची रवानगी बालसुधारगृहात केली. त्याचेकडून गुन्हयात वापरलेले तलवार चाकू आणि दगह जप्त करण्यात आले. या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी विनायक चौगुले याच्यावर कोल्हापुर येथील खाजगी दवाखान्यात उपचार सुरू असल्याने तेथील उपचार पुर्ण झाल्यावर पोलीस त्याला ताब्यात घेणार असल्याचे पोलीस सुत्रानीं सांगितले. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपविभागीय पोलीस अधिकारी समीर साळवे याच्या मार्गदर्शनाखाली शहापुर पोलीस करीत आहेत. विवाहबाहय संबंध हे कधीही घातकच असतात. त्याची वाच्यता झाली की त्याचा बोभाटा होतो आणि त्याच्याही पुढे जावून खूनासारखी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## दलित मुलीशी लग्नाचा केला ...

त्यामुळे घरात वाद देखील निर्माण होत होता. दोघांनी पळवून जाऊन लग्न करण्याचे ठरवले. ही गोष्ट संदीपच्या वडिलांना कळली. त्यावरून वडील नागोराव व संदीपमध्ये वाद झाला. या दरम्यान वडिलांनी आपल्या दुसऱ्या मुलाच्या मदतीने घरातच संदीपचा गळा आवळून हत्या केली. त्यानंतर संदीपचे हातपाय बांधून घराला कुलूप लावून सर्व बाहेरगावी निघून गेले. शुक्रवारी सायंकाळी घरी परतले आणिआपल्या मुलाला कोणीतरी मारले, असा बनाव रचला. पोलिसांच्या तपासात सर्व प्रकार उघडकीसझाला. या प्रकरणी वडील आणि मृतकाचा भाऊ यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पिंजर पोलीस करीत आहेत.

## वहिनीला बदनाम करण्याची धमकी...

मात्र, काल सायंकाळी तिघांचेही मृतदेह शेततळ्यात आढळून आल्या तालुक्यात खळबळ उडाली आहे. सौ. ज्योती जालिंदर कोटकर या मुलगा हरीश (वय ५) व कृष्णा (वय ७) यांच्यासह दिनांक ५ फेब्रुवारी २०२४ सकाळी ८ वा. पासून घरी कुणालाही न सांगता घरातून निघून गेले आहेत. मात्र काल सायंकाळी महिला आणि तिच्या दोन्ही मुलांचा मृतदेह शेततळ्यात आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती कळताच लासलगावचे स.पो.नि.भास्करराव शिंदे, पो.उपनिरीक्षक प्रवीण उदे फौजफाट्यासह तातडीने घटनास्थळी दाखल होत मृतदेह शवविच्छेदनासाठी निफाडच्या सरकारी रुग्णालयात पाठविण्यात आले. मयत ज्योतीचे बंधू ललित कैलास कापसे रा.निफाड यांचे माहितीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात सी.आर.पी.सी कलम १७४ अन्वये आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उधारीच्या वसुलीसाठी दारूवाला ...

दारूचे व्यसन जडले होते. ज्यावेळेस त्याच्या खिशात पैसा असायचा, त्यावेळेस तो ऐष करायचा. सर्व पैसा दारूत उडवायचा. त्याच्या या वागण्याने त्याच्या घरातील सर्व जण वैतागले होते. केंदळ खुर्दमध्ये दारूचा मोठा धंदा करणारा रायभान एकनाथ बर्डे होता. त्याची आणि गवजीची चांगली ओळख होती. पैसे नसले तरी गवजी जाधव बऱ्याचदा उधारीवर रायभान बर्डे याच्याकडून दारू प्यायचा. परिणामी पैसा असो वा नसो रोजच गवजी दारू पिवूनच घरी जायचा. दिवसेंदिवस त्याची दारूची लत वाढत चालली होती. असे असले तरी दारूबरोबरच कुटुंबावरही तो प्रेम करायचा. रायभान बर्डेची गवजी जाधवकडे दारूची ५० रूपयांची उधारी होती. रायभानने बऱ्याचदा मागणी करूनही त्याला ५० रूपये गवजीने दिले नाही. याचा रायभानला खूप राग आला होता. रावजीलाही दारूचे खूपच व्यसन जडल्याने त्याला पैसे पुरत नव्हते. अन् ५० रूपयाएवढी छोटी रक्कमही तो त्याला देऊ शकत नव्हता. रायभान वरचेवर त्याच्याकडे तगादा करत होता. शुक्रवार दि. ५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ५ वाजण्याच्या सुमारास गवजी स्लॅबच्या कामाला जातो असे सांगून घराबाहेर पडला होता. तो गेल्यानंतर त्याची. बायकोही घरात भाकरी थापून जवळच्याच मानोरी शिवारातील कातोरे यांच्या शेतात १० वाजता खुरपणी करण्यासाठी गेली होती. दोघेही आपापल्या कामावर गेले होते. रावजीची बायको जया ही कातोरेच्या शेतात खुरपण्याचे काम करत असतांना दुपारी २ वाजण्याच्या सुमारास तिचा मुलगा सागर गावातील दिपक जाधव याची मोटरसायकल घेवून तिच्याकडे आला होता. आल्या-आल्या त्याने आईला सांगितले, आप्पाला म्हणजे गवजीला रायभान बर्डे याने मारहाण केली आहे. तू लवकर घरी चल असे तो म्हणताच जयाने आपल्या हातातील गवत खुरपायचे काम तसेच सोडले. ती सागरच्या पाठीमागे मोटरसायकलवर बसली. सागर आई जयाला घेवून तडक घरीआला होता. गावातील संजाबाई - मच्छिंद्र पवार हिने सांगितले की मी व सर्जेराव अंकुश जाधव असे दोघे जण दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास काही कामानिमित्त मानोरी येथे गेलो होतो. तेथील काम आटोपून दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास मानोरी येथील रायभान एकनाथ बर्डे याच्या घरासमोरूनजात असतांना वेगळंच बघायला मिळालं. रायभान हा गवजीकडे त्याचे उधारीचे पैसे मागत होता. गवजी त्याला गयावया करून नंतर देतो असे म्हणत होता. त्याचे काही न ऐकता रायभान त्याला शिवीगाळ करून छातीत, पाठीत लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत होता. गवजीला बेदम मारहाण झाल्याने तो निपचित पडला होता. त्यावेळेस अरूण गुलाब जाधव, सर्जेराव अंकुश जाधव या दोघांनी गवजीला उपचारासाठी राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात आणले होते.

गवजीची बायको जया ही इतर नातेवाईकांना घेवून सरकारी दवाखान्यात आली असता तेथीलवैद्यकीय अधिकाऱ्यांनी गवजी उपचारापूर्वीच मयत झाल्याचे सांगितले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी याची रितसर माहिती पोलीस स्टेशनला कळवली. ग्रामीण रूग्णालयातून राहुरी पोलीस ठाण्यात खबर आल्यानंतर पोलीस यंत्रणा सतर्क झाली. वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसउपनिरीक्षक समाधान फडोळ, पोलीस नाईक रविंद्र कांबळे तातडीने ग्रामीण रूग्णालयात गेले. त्यांनी तेथील मयत गवजी जाधवचे नातेवाईक तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली. पोलीस अधिकाऱ्यांनी डी. वाय. एस.पी. डॉ. बसवराज शिवपुजे यांना घटनेची माहिती देवूनपुढील तपासास सुरूवात केली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मयताची उत्तरीय तपासणी करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. मयताच्या नातेवाईकांनी त्यांच गावी केंदळ खुर्द येथे मयतावर अंत्यसंस्कार केले. दरम्यान राहुरी पोलिसांनी गवजीची पत्नी जया जाधव (वय ३९) हिची रितसर फिर्याद घेवून संशयीतआरोपी रायभान एकनाथ बर्डे याच्याविरूद्ध गुन्हा रजि. नं. ०१२/ २०२४ नुसार भा. दं. वि. ३०२ अन्वये खुनाचा गुन्हादाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच आरोपी रायभान बर्डे हा फरार झाला. पोलिसांनी त्याची माहिती काढून रायभान बर्डे याला अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला सुरुवातीला पोलिस कोठडी सुनावली. डी. वाय.एस.पी. डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ, पोलीस नाईक रविंद्र कांबळे पुढील तपास करत आहेत.

## वकील दांपत्याचे काय सांगा चुकले...

दोघांना त्यांच्याच घरात बंदिस्त करून पाच लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. आढाव दांपत्याने पैसे देण्यास नकार दिल्यावर पाच-सहा तास छळ केला. रात्रीच्या सुमारास दोघांच्या डोक्यामध्ये प्लास्टिक पिशव्या घालून त्यांना मारण्यात आले. आढाव दाम्पत्याचे मृतदेह उंबरे गावातील स्मशानभूमीजवळ असलेल्या विहिरीमध्ये दगड बांधून टाकून दिले. ऑल इंडिया लॉयर्स युनियन या वकिलांच्या राष्ट्रीय संघटनेकडून सर्व आरोपींना अटक करून, विशेष सरकारी वकिलांची या प्रकरणात नियुक्ती करून जलदगती न्यायालयाच्या मार्गाने वेगाने कडक शिक्षा देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. या दुर्दैवी घटनेनंतर महाराष्ट्रात अधिवक्ता संरक्षण कायदा लागू करण्याची मागणी एआयएलयू पुन्हा करत आहे. एआयएलयू आढाव कुटुंबियांशी सहवेदना व श्रद्धांजली व्यक्त करते आणि राज्यातील विविध न्यायालयातील बार असोसिएशन्स यांना या घटनेचा वेगवेगळ्या पद्धतीने तीव्र निषेध करण्याचे आवाहन करत आहे. मागील २०२३ साली उत्तर प्रदेशात ॲड. उमेश पाल यांची दिवसाढवळ्या हत्या झाली. एप्रिल महिन्यात दिल्लीतील द्वारका परिसरात दोन हल्लेखोरांनी वकील वीरेंद्र कुमार नरवाल यांची गोळ्या झाडून हत्या केली. या वकिलाकडे आरोपीच्या कुटुंबातील वादातीत शेतीच्या भूखंडाचे दस्तऐवज होते. हत्येच्या निषेधार्थ दिल्लीच्या वकिलांकडून सर्व जिल्हा न्यायालयांमध्ये काम बंद ठेवण्यात आले आणि सर्व जिल्हा बार असोसिएशनच्या समन्वय समितीने जामीन व सुनावणीला गैरहजर राहण्याचा तसेच न्यायालयातील फोटोकॉपी मशीन बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो, २०२० मध्ये भारतात वकिलांवरील हल्ल्याची १४३ प्रकरणे समोर आली आहेत. वकिलांना अनेकदा यांचे पक्षकार, विरोधक आणि अगदी न्यायाधीशांकडून देखील छळवणूक आणि धमक्यांचा सामना करावा लागतो. हल्ल्यांमद्धे शाब्दिक शिवीगाळ, धमक्या, शारीरिक हल्ला, मारहाण, दुखापत, हत्या यांचा समावेश असतो. २०२२च्या संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, २०१० ते २०२० या दशकात जगभरात २,५०० हून अधिक वकील मारले गेले, ताब्यात घेतले गेले किंवा त्यांचे अपहरण झाले आहे. म्हणूनच वकिलांच्या सुरक्षिततेला असलेल्या धोक्याबद्दल जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जगभरात २०१० पासून दरवर्षी आंतरराष्ट्रीय संकटग्रस्त वकील दिन साजरा केला जातो.

आपल्या देशात २१ मार्च २०२३ रोजी राजस्थान राज्य विधानसभेने वकिलांविरुद्ध हिंसाचार रोखण्यासाठी सुधारित स्वरूपात राजस्थान अधिवक्ता संरक्षण विधेयक, २०२३ मंजूर केला. तिथे वकिलांच्या कल्याणासाठी राज्य सरकारकडून दरवर्षी ५ कोटी रुपये बार कौन्सिलला दिले जातात. तसेच एखाद्या गुन्हेगाराने वकिलाच्या मालमत्तेचे नुकसान केल्यास न्यायालयाने निश्चित केलेल्या नुकसानभरपाईची रक्कम वसूल करून पीडित वकिलाला देण्याची तरतूद त्या कायद्यात करण्यात आली आहे. वकिलांचे संरक्षण कायदा लवकरात लवकर लागू करणे महाराष्ट्रासह देशभरातील सर्व राज्यांमध्ये आवश्यक आहे. पंजाब आणि हरियाणा राज्य बार कौन्सिलने पंजाब ॲडव्होकेट्स (संरक्षण) विधेयक २०२३ आणि हरियाणा ॲडव्होकेट्स (संरक्षण) विधेयक २०२३चे दोन मसुदे पंजाब आणि हरियाणा या दोन्ही राज्यांना पाठवले आहेत आणि ते लवकरात लवकर लागू करण्याची मागणी केली आहे. त्यासाठी योग्य ती पावले न उचलल्यास राज्यव्यापी आंदोलनात सहभागी होऊन शांततापूर्ण आंदोलन करण्याचा इशारा दोन्ही राज्यांच्या बार कौन्सिलने दिला आहे. वकिलांना अशा छळ आणि धमकीला न घाबरता त्यांची कर्तव्ये पार पाडता यावीत याकरिता अधिवक्ता संरक्षण कायद्याद्वारे संरक्षण सुनिश्चित करणे गरजेचे आहे. अधिवक्ता संरक्षण कायदा लागू झाल्यास वकिलांना हल्ला, गंभीर दुखापत, गुन्हेगारी शक्ती आणि धमकावण्यापासून काही प्रमाणात संरक्षण मिळू शकेल. त्यांच्या मालमत्तेचे नुकसान भरून निघू शकेल. मात्र राज्यभरातील वकिलांची मते घेऊन निवडून आलेले महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य मात्र या बाबत कमालीचे निष्क्रिय व उदासीन आहेत. त्यांनी त्वरित याबाबतीत पावले उचलण्याची मागणी एआयएलयूतर्फे करण्यात आली आहे.

## दारूसाठी पैसे देण्यास नकार...

मधोमध जवळच असलेल्या चाकूने मंगेशवर अनेक वार करून गंभीर जखमी केले आणि तेथून पळ काढला. या घटनेची माहिती परिसरातील रहिवाशांनी पोलिसांना दिली होती. मात्र, पोलीस घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच मंगेशच्या कुटुंबीयांनी आणि तेथील नागरिकांनी त्याला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी कपिलनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी राहुल रामटेके याला अटक केली आहे. आरोपी राहुल हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून त्याचा भाऊही एका खुनाच्या गुन्ह्यात कारागृहात शिक्षा भोगत असल्याचं सांगण्यात येत आहे.

12 TO 18 FEBRUARY 2024 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 2/10/2024 8:30 PM Page 1



# न्यायासाठी पायी मोर्चाने निघालेल्या आशा स्वयंसेविका भिवंडीत चक्कर येऊन कोसळल्या



**भिवंडी/प्रतिनिधी**

आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी शहापूर ते मंत्रालय येथे पर्यंत पायी मोर्चा घेऊन निघालेल्या सुमारे २७ महिलांना उष्माघाताचा त्रास झाल्याने भिवंडीत चक्कर येऊन कोसळण्याची घटना घडली आहे.या सर्व महिला स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. बुधवारी शहापुर येथून सुरू झालेला मोर्चा गुरुवारी भिवंडी तालुक्यात दाखल झाला. मुंबई नाशिक महामार्गा वरील सोनाळे ग्रामपंचायत हद्दीत वालशिंद येथे दुपारी मोर्चा जेवणासाठी थांबले असता, त्यावेळी उष्माघाताने या मोर्चात पायी निघालेल्या २७ महिलांना चक्कर उलटी मळमळ याचा त्रास जाणवू लागल्याने अनेक जण बेशुद्ध पडल्या. त्यानंतर मोर्चातील पदाधिकाऱ्यांनी तातडीने रुग्णवाहिके च्या मदतीने या सर्व महिलांना शासकीय उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. येथे महिलांवर उपचार सुरू असताना काही महिलांना अधिक त्रास जाणवू लागल्याने त्यांची प्रकृती गंभीर बनली आहे. महिलांना डोळ्यासमोर अंधार येणे, चक्कर येणे, उलटी येणे, अंग थरथर कापणे अशा प्रकारचे त्रास जाणवत आहे.

दरम्यान उष्माघाताने उपचारासाठी दाखल आशा व गट प्रवर्तक लता बाळकृष्ण दामसे, मीना दिलीप ठाकरे, साधना हरड, प्रतीक्षा ठाकरे, आनंदी मंगेश सोंगा, शारदा विशे, प्रतीक्षा डोहळे, सीमा राजू भला, भक्ती बळीराम राऊत, विशाखा पाटील, अंकिता किसले, संगीता लुटे, वंदना कबाडे, प्रमिला जाधव, रंजना बोरकर, आम्रपाली पंडित, प्रतिभा सूर्यवंशी, संगीता काशीकर, वंदना इंगळे, पूजा कांबळे, सुनंदा जाधव, प्रियंका क्षीरसागर, माया मोरे, मनिषा पवार, कांचन म्हसकर, इरोपा सोनवणे, ललिता रोकडे अशी महिलांची नावे आहेत.

# हजयात्रेकरुंच्या सुविधेसाठी भिवंडीत पालिकेकडून वैद्यकीय शिबिराचे आयोजन



**भिवंडी/प्रतिनिधी**

हजयात्रेसाठी जाणाऱ्या यात्रे करुंना वैद्यकीय दृष्ट्या सदृढ असल्याबाबत फिटनेस प्रमाणपत्र देण्यासाठी भिवंडी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागा कडून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा शुभारंभ आयुक्त अजय वैद्य यांच्या शुभहस्ते करण्यात आला. भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हज यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंनी पालिका मुख्यालय इमारती मधील औषध भांडारगृह, तळ मजला येथे सुरू असलेल्या आरोग्य शिबिरात सकाळी १० ते सायंकाळी ०४ या वेळेत तज्ञ डॉक्टरांमार्फत वैद्यकिय तपासणी करून निःशुल्क वैद्यकिय फिटनेस प्रमाणपत्र देण्यात येत आहे.तसेच हज यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंनी वैद्यकिय तपासणी साठी येतांना सोबत स्वतःचे रक्त चाचणी अहवाल, एक्स-रे रिपोर्ट व हज कमिटीमार्फत दिलेले फॉर्म घेवून यावे व ज्यांना शारीरिक आजार जसे मधुमेह, रक्तदाब किंवा इतर आजाराची औषधे सुरू असल्यास ही बाब तपासणीच्या वेळी डॉक्टरांच्या निदर्शनास आणून द्यावी असे आवाहन आरोग्य विभाग कडून करण्यात आले आहे. या वर्षी शहरातून जवळपास ६०० श्रद्धाळू भाविक हजयात्रेला जाणार आहेत, अशा वेळी पालिके मार्फत देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेचा लाभ यात्रेकरुंनी घ्यावा असे आवाहन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना आदर्श विद्यार्थी घडवते - प्रा.केंद्रे



**लातूर/प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देते. राष्ट्रीय सेवा योजनेतून आदर्श विद्यार्थी घडविण्याचे कार्य होते, असे प्रतिपादन राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले. श्री हरिहर प्रतिष्ठान संचलित येथील गोविंदलाल कन्हैय्यालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालयाचे 'युवकांचा ध्यास ग्राम, शहर विकास' या सात दिवशीय विशेष युवक शिबिराचे उद्घाटन तालुक्यातील बोरवटी येथे झाले, त्यावेळी उद्घाटक म्हणून प्राचार्य केंद्रे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव धनराज जोशी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच अनुजा नाथजोगी, उपसरपंच संतोष ढमाले, ग्रामसेवक ए. व्ही. मडके, संस्थेचे कोषाध्यक्ष लक्ष्मीकांत जोशी, सदस्य रमेश बोरा, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका कटके, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष ज्योतीराम लकडे, प्राचार्या डॉ. सुजाता चव्हाण यांची उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य केंद्रे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून उद्याच्या राष्ट्र निर्मितीचा स्त्रोत म्हणून युवकांकडे आपण पाहतो. त्या युवकांची जडणघडण अशा शिबिरातून होते. म्हणूनच आजच्या काळात युवकांपुढे आदर्श निर्माण करण्याची गरज आहे. युवकच देशाचा आधारस्तंभ आहे. हाच देशात परिवर्तन घडवू शकतो. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांतून आदर्श विद्यार्थी घडविण्याचे कार्य होते. राष्ट्रीय सेवा योजना ही तरुणांना घडवणारी व प्रेरणा देणारी कार्यशाळाच आहे, असेही त्यांनी सांगितले.यावेळी सरपंच नाथजोगी यांनी भाषणात विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिले. संस्थेचे सचिव जोशी यांनी शिबिराची माहिती देवून गतवर्षीच्या शिबिरात बोरवटीकरांनी सहकार्य केले, याबद्दल आभार मानून या वर्षीच्याही शिबिराला ग्रामस्थांचे सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. सचिन प्रयाग यांनी तर सूत्रसंचालन प्रा. नयन भादुले - राजमाने यांनी केले. आभार प्रा. नीलेश क्षीरसागर यांनी मानले.

# वसई-विरार परिसरात सराईत सोन साखळी चोराच्या आवळल्या मुसक्या




**विरार/प्रतिनिधी**

सोनसाखळी चोरास जेरबंद करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांना यश मिळाले आहे. या आरोपीकडून ४ गुन्ह्यांची उकल करून ४ लाख ३८ हजारांचे ७३ ग्रॅम सोने हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी सोमवारी दिली आहे. विरारच्या यशवंत हाईट्स येथे राहणाऱ्या ज्योती जैन (२८) या महिलेच्या गळ्यातून २५ जानेवारीला रात्री १० वाजण्याच्या सुमारास त्या दुचाकीवरून घरी जात असताना सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेल्याची घटना घडली होती. त्या जुन्या विवा कॉलेज समोरील रिलायन्स मार्टजवळ आल्यावर त्यांच्या पाठीमागून आलेल्या दुचाकीवरील चोरट्याने त्यांच्या गळ्यातून ९५ हजारांचे साडे सतरा ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र जबरीने खेचुन जकात नाक्याकडे पळून गेला होता. विरार पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. पोलीस आयुक्तालया अंतर्गत येणाऱ्या विरार, अर्नाळा, नालासोपारा परिसरात गेल्या काही महिन्यापासुन रस्त्यावरुन वाहन चालवणाऱ्या महिलांचे गळ्यातून मंगळसूत्र, सोन्याची चेन जबरीने चोरून नेण्याच्या घटनांचे प्रमाण वाढले होते. सदर घटनांची वरिष्ठांनी गंभीर दखल घेऊन आरोपींचा शोध घेवुन पायबंद करण्याच्या सुचना दिल्या होत्या. सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी गुन्हयाचा तपास गुन्हे शाखेच्या युनिट तीनकडे देण्यात आला. गुन्हे शाखेने वेगवेगळे पोलीस पथक तयार करुन आयुक्तालय परिसरात घडणारे चेन स्नॅचिंगचे विविध गुन्हयाचे अवलोकन करुन आरोपीने गुन्हयात वापरलेले वाहन तसेच आरोपी याची गुन्हे करण्याची पद्धतीवरुन त्याची माहिती मिळवली. आरोपी अमित नमू शनवार (२८) याला गुन्हयात वापरलेली दुचाकी व हेल्मेटसह ताब्यात घेतले. त्याचेकडे तपास करत पोलीस कोठडी दरम्यान एक सोन्याची चेन व सोन्याची लगड असा ७३ ग्रॅम ५०० मिली वजनाचा ४ लाख ३८ हजार २०० रुपये किमतीच्या मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपीकडून पोलीस कोठडी दरम्यान ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदरची कामगिरी पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक अभिजित टेलर, उमेश भागवत, पोलीस हवालदार अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे, सायबर सेलचे संतोष चव्हाण यांनी पार पाडली आहे.

# एन्काऊंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्या घरावर आयकर विभागाचे छापे



**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबईचे माजी पोलीस अधिकारी आणि एनकाउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्या घरावर आज आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी छापा टाकला. आयटी अधिकाऱ्यांनी करचुकवेगिरीप्रकरणी मुंबईतील अंधेरी भागातील प्रदीप शर्मा यांच्या निवासस्थानाची झडती घेतली. प्रदीप शर्मा यांना याआधी मनसुख हिरेन हत्येप्रकरणी अटक करण्यात आली होती. फ्री प्रेस जर्नलने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. २५ फेब्रुवारी २०२१ रोजी जिलेटिनने भरलेली एक चारचाकी अँटिलियाजवळ सापडली होती. तर ५ मार्च रोजी या चारचाकीचा मालक मनसुख हिरेन ठाण्याच्या खाडीत मृतावस्थेत आढळला. नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी (एनआयए) हा तपास महाराष्ट्र पोलिसांकडून तपास हाती घेतलाय. तपासाअंती जून २०२१ मध्ये प्रदीप शर्मा यांना अटक करण्यात आली. या प्रकरणात बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाजेचाही हात असल्याचं समोर आलं होतं. शर्मा यांच्या घरावर छापा टाकण्याबरोबरच आयटी अधिकाऱ्यांनी माजी खासदार रमेश दुबे आणि त्यांच्या रिअल इस्टेट डेव्हलपर मुलाच्या निवासस्थानाचीही झडती घेतली. रमेश दुबे हे महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि उत्तर प्रदेशचे माजी खासदार आहेत.

# भिवंडीत दीड लाखांचा आठ किलो गांजा जप्त



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडीत शांतीनगर पोलिसांनी केलेल्या कारवाईत एका व्यक्तीस ताब्यात घेऊन त्याच्या जवळून ८ किलो ५० ग्रॅम वजनाचा १ लाख ६१ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त करण्याची कारवाई केली आहे. शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर इंदलकर यांना गुप्त बातमीदारा मार्फत शहरात एका व्यक्ती गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्या नंतर शांतीनगर पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी कर्मचारी यांच्या पथकाने शांतीनगर परिसरातील बी एम सी पाईपलाईन चौकीजवळ दुपारी सापळा रचला असता त्याठिकाणी संशयित व्यक्ती शकील अकील मोमीन रा.न्युआझादनगर, शांतीनगर यास पोलिस पथकाने ताब्यात घेऊन त्याची अंग झडती घेतली. त्याच्या जवळील प्लॅस्टीकच्या गोणीत चार पॉकेटमध्ये बांधलेले ८ किलो ५० ग्रॅम गांजा आढळून आला. १ लाख ६१ हजार किमतीचा गांजा व दुचाकी मोबाईल असा एकूण २ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत त्याच्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

## मीरारोड येथील तीन मजली इमारतीच्या गच्चीवरुन पडून ११ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू

भाईंदर : मिरा रोड येथे तीन मजली इमारतीच्या गच्चीवरून पडून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.हमजा मुस्ताक कुरेशी असे मयत मुलाचे नाव आहे. मिरा रोडच्या पूजा नगर येथील सरयू अपार्टमेंट मध्ये मुस्ताक कुरेशी आपल्या पालकांबरोबर राहत होता. मंगळवारी सायंकाळी तो इमारतीच्या गच्चीवर खेळायला गेला असताना तोल जाऊन खाली पडला. यावेळी त्याला उपचारासाठी मिरा रोडच्या खासगी रुग्णालयात हलवण्यात आले होते. मात्र डोक्याला जबरन मार लागल्याने उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला असल्याची माहिती नया नगर पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी नरेंद्र कोरे यांनी दिली.


**कृषी विभाग**

**उप विभागीय कृषि अधिकारी वाडा, जिल्हा पालघर**

**शुद्धीपत्रक क्र. २**

**ई-निविदा सूचना क्र.उविकृअक-०२/२०२३-२४ (सुधारीत)**

या कार्यालयाकडून निविदा सुचना क्र. उविकृअक-०२/२०२३-२४ अन्वये मृद संधारण कामांची ई-निविदा जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. परंतु नजरचुकीने सदर जाहिरातीमध्ये ई-निविदा कामांची रक्कम ही आकस्मिक खर्चासह दर्शविण्यात आलेली आहे. तरी यापुर्वी प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात ही या शुद्धीपत्रकान्वये रद्द करण्यात येत आहे. सुधारीत जाहिरात खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे वाचण्यात यावी. सविस्तर माहिती महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक निविदा व्यवस्थापन प्रणालीचे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०८/०२/२०२४ रोजी पासून पहावयास व डाऊनलोड करावयास मिळतील. सर्व शुद्धिपत्रक, दुरुस्त्या सुद्धा याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. कामाचे संक्षिप्त वर्णन खालीलप्रमाणे. (रक्कम-रुपये)

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाना रक्कम | निविदा शुल्क + GST | नोंदणी वर्ग | निविदा डाऊनलोड सुरू करणे दिनांक | निविदा सादर करणेचा अंचिम दिनांक | निविदा उघडणे दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **पात्र नोंदणीकृत कंत्राटदारासाठी** | | | | | | | |
| १. | **मजगी,** गाव -गोमघर, गट क्र. १ व ६ ते १४, ता. मोखाडा गाव -जोगलवाडी, गट क्र. ३० ते ३३, ता. मोखाडा | १९१२४४२ | १९१२४ | ५९० | योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार | ०८/०२/२०२४ स. ११.०० वा. | २२/०२/२०२४ दु. ४.०० वा. | २३/०२/२०२४ दु. ४.०० वा. |
| | **पालघर जिल्ह्यातील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेसाठी** | | | | | | | |
| २. | **मजगी,** गाव -जोगलवाडी, गट क्र. १६ ते २९, ता मोखाडा | १८३९२०४ | १८३९२ | ५९० | ५-अ व त्यावरील | ०८/०२/२०२४ स. ११.०० वा. | २२/०२/२०२४ दु. ४.०० वा. | २३/०२/२०२४ दु. ४.०० वा. |
| | **पालघर जिल्ह्यातील नोंदणीकृत मजुर कामगार सहकारी संस्था यांचेसाठी** | | | | | | | |
| ३. | **मजगी,** गाव - सायदे, गट क्र. ५८ ते ७१, ता. मोखाडा | १७८७४०३ | १७८७४ | ५९० | म का स स वर्ग a | ०८/०२/२०२४ स. ११.०० वा. | २२/०२/२०२४ दु. ४.०० वा. | २३/०२/२०२४ दु. ४.०० वा. |

टिप : मा.संचालक, मृद संधारण व पाणलोटक्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडील मा.सु. जा.क्र. मृदस/मृद-६/ई-निविदा/१२६०१/२०२३ दि. ०६/०४/२०२३ अन्वये ई निविदा मार्गदर्शकसूचना नुसार प्रत्येक निविदा धारकांना निविदा भरण्यापुर्वी कामाची व्याप्ती, निविदेतील नमूद माहितीची पडताळणी करणेसाठी प्रकल्प कामाचे ठिकाण व इतर महत्वाच्या कार्यक्षेत्राची पाहणी करणे बंधनकारक राहील. सदर क्षेत्राची भेट प्रभावी असावी व त्याकरीता प्रत्येक कार्यक्षेत्राची पाहणी करून किमान ३ कार्यस्थळांचे Geo Tagging फोटो व सर्व गटांची पाहणी केलेबाबतचे प्रमाणपत्र स्वासांक्षाकीत करून योग्य त्या लिफाफ्यामध्ये सादर करावे. सदर बाबत सविस्तर, तपशिल व सादर करावयाच्या प्रमाणपत्राचा नमूना निविदा संचात समाविष्ट आहे. कोणतीही एक किंवा सर्व निविदा कोणतेहीकारण न देता नाकारण्याचा अधिकार उप विभागीय कृषि अधिकारी वाडा जिल्हा पालघर यांनी राखून ठेवला आहे.ॉ

**सही/-**

**उप विभागीय कृषि अधिकारी**

**वाडा, जिल्हा पालघर**

# रक्तरंजित महाराष्ट्र!

धोकेबाज, घोटाळेबाज, माफिया आणि गद्दार लोक जेव्हा एकत्र येऊन एखाद्या राज्याचे सरकार चालवतात, तेव्हा त्यांच्याकडून जनतेला कुठल्याही प्रकारची चांगली अपेक्षा नसते. आज महाराष्ट्रात तसेच झालेले आहे. पूर्वी जे लोक म्हणत होते की महाराष्ट्राचा बिहार झालाय, त्या लोकांनी आज महाराष्ट्राचा बिहार नव्हे, तर अफगाणिस्तान केलाय. कुठे कधी घातपाती घटना घडतील, याचा नेम नाही. महाराष्ट्रात आज लोक पूर्णपणे असुरक्षित आहेत. महाराष्ट्रात आज महायुतीचे जे सरकार आहे, त्या सरकारमध्ये तीन वेगवेगळ्या विचारांचे पक्ष असल्यामुळे, त्यांच्यात एक वाक्यता नाही. त्यांना फक्त सत्तेच्या माध्यमातून पैसे कमवायचे आहेत. त्यासाठी ते एकत्र आलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात कितीही रक्तरंजित घटना घडत असल्या तरी सरकारमध्ये बसलेल्यांना त्याची अजिबात चिंता नाही. जर त्यांच्याकडे थोडीफार जरीमत्ता शिल्लक असती, तर जो कुणी गृहमंत्री आहे त्याने पंधरा दिवसात घडलेल्या तीन रक्तरंजित घटना नंतर महाराष्ट्राची माफी मागून राजीनामा दिला असता. पण तसे न करता निर्लज्जपणे सांगितले जाते की, रस्त्यावरचा कुत्रा मेला तरी गृहमंत्र्याचा राजीनामा मागतील. अरेच्चा! म्हणजे गिरे तो भी टांग उपर! या देशात आजवर इतका निर्लज्जपणा कोणीही, कधीही पाहिलेला नव्हता. एक रेल्वे अपघात झाला तर त्याची नैतिक जबाबदारी घेऊन, राजीनामा देणाऱ्या लालबहादूर शास्त्रींसारख्या चारित्र्यवान नेत्याचा हा देश आहे. दुर्दैवाने सध्या नेत्यांकडे चारित्र्य नसल्यामुळ त्यांना लोक जगले काय किंवा मेले काय? काहीही घेणे देणे नाही. देशाची परिस्थिती तर वाईट आहेच, परंतु शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्राची स्थिती सगळ्यात वाईट आहे. गेल्या पंधरा दिवसात खून खराब्याच्या तीन मोठ्या घटना घडल्या आहेत. एका घटनेत आमदारानेच पोलीस ठाण्यात घुसून गोळीबार केला. दुसऱ्या घटनेत जळगावमध्ये एका नगरसेवकावर फायरिंग झाली. आणि तिसऱ्या घटनेत दहिसरमध्ये दोन वेळा नगरसेवक राहिलेल्या, ठाकरे गटाच्या माजी नगरसेवकाची हत्या करून हल्लेखोराने स्वतःही आत्महत्या केली. आता प्रश्न असा येतोय की एवढा भयंकर रक्तपात जे लोक घडवत आहेत, त्यांच्याकडे शस्त्रे कुठून येतात? महाराष्ट्र सरकारने कधीही या गोष्टीचा विचार केलेला नाही. त्यामुळे आजही महाराष्ट्रातील गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडे बेकायदेशीर शस्त्र आहेत आणि त्यामुळेच कोणीही, कोणालाही कुठेही गाठून ठार मारू शकतो. आमदार गणपत गायकवाड यांच्याकडे पिस्तुलाचा परवाना होता, पण तो त्याला कोणी दिला? तसेच त्या पिस्तुलाचा त्यांनी किती वेळा गैरवापर केला? तो परवाना त्याने रिन्यू केला आहे की नाही? याची कोणतीही माहिती पोलिसांकडे नाही. त्याचबरोबर दहिसर मधील घटनेत अभिषेक घोसाळकर यांना गोळ्या घालून स्वतःही आत्महत्या करणारा मॉरिस नोरोव्हा हा एक दाखलेबाज गुंड होता. त्याच्यावर अनेक गंभीर गुन्ह्यांच्या नोंदी होत्या. तरीही सन्माननीय गृहमंत्र्यांच्या पत्नीच्या हस्ते त्याला समाजभूषण पुरस्कार देण्यात आला होता. आता या समाजभूषण मॉरीसने एका माजी नगरसेवकाचा खून करून स्वतःही आत्महत्या केलेली आहे. सरकारने अशा किती समाजभूषण गुंडांना आपल्या पदरी बाळगले आहे. याची एकदा माहिती जाहीर करावी. गुंडांना जर पुरस्कार देऊन समाजात मोकळे रान करून दिले, तर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची काय अवस्था होईल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भारतीय जनता पक्षाकडून नेहमीच शिस्तीचे ढोल वाजवले जातात. पण गेल्या काही वर्षापासून त्यांच्या शिस्तीची पोलखोल झालेली आहे. दुसऱ्या पक्षातील चोर चंडाळ लोकांना, केवळ सत्तेसाठी आपल्या सोबत घेऊन महाराष्ट्राची वाट लावायची, हे एकमेव धोरण सध्या भाजपाचे आहे की काय, अशी संपूर्ण महाराष्ट्रात चर्चा सुरू झाली आहे. आणि लोकांचा हा आरोप १०० टक्के खरा आहे. कारण आज महाराष्ट्र शांततेने जगणाऱ्या लोकांसाठी सुरक्षित राहिलेला नाही. महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था उत्तम राहावी, सर्वांना सुरक्षेची हमी मिळावी, असे जर वाटत असेल, तर सर्वच राजकीय पक्षांमधल्या गुंडांची चौकशी व्हायला हवी. महाराष्ट्राच्या राजकारणात आज बहुतेक नेत्यांनी आपल्या पदरी गुंड पाळलेले आहेत आणि या गुंडांना शस्त्र परवाना मिळवून देण्याचे काम सुद्धा या नेतेमंडळींनी केलेली आहे. त्यामुळे आज ज्यांच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. अशा लोकांकडे शस्त्रे आहेत. मग तो शरद मोहोळ असो, गजा मारणे असो, की राज्यातले इतर कोणी गुंड असोत, या सर्वांकडे आणि त्यांच्या साथीदारांकडे शस्त्रे आहेत. त्यामुळे या सर्वांच्या घरांची कार्यालयाची झडती घ्यायला हवी. आणि जर त्यांच्याकडे बेकायदेशीर शस्त्रे सापडली, तर त्यांच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी. त्याचबरोबर बेकायदा शस्त्र सापडलेल्या कार्यकर्त्यांना, तात्काळ त्या पक्षांनी आपल्या पक्षातून बाहेर काढायला हवे. पण तसे सध्या तरी होणार नाही. कारण लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आहेत आणि निवडणूक जिंकण्यासाठी गुंडांची मदत लागते. त्यामुळे दाखलेबाज गुंड बिंदास आहेत. त्याना ठाऊक आहे की, आपल्याकडे शस्त्रे असली तरी आपले कुणी काही वाकडे करू शकणार नाही. कारण आपल्या मागे आपला राजकीय गॉडफादर उभा आहे. त्यामुळे काळजी करायची आवश्यकता नाही. गुंडांच्या याच मानसिकतेमधून ते आपल्याकडे असलेल्या बेकायदा शस्त्राचा, कधीही कुठेही वापर करून एखाद्याचा गेम करू शकतात आणि म्हणूनच महाराष्ट्र आज रक्तरंजित बनत चालला आहे. परंतु याला आवर कसा घालणार? कारण हे सर्व घडवून आणणारे राजकीय पुढाऱ्यांचेच लोक आहेत. त्यांच्यावर कोण कशी कारवाई करणार? म्हणूनच उल्हासनगर, जळगाव आणि नुकत्याच घडलेल्या दहिसरच्या घटनेनंतर सरकारला थोडी जरी लाज असेल किंवा महाराष्ट्रातल्या साडेबारा कोटी जनतेची काळजी असेल, तर त्यांनी तात्काळ महाराष्ट्रातील सर्व गुंड टोळ्यांमधल्या दाखलेबाज गुंडांच्या घरावर धाडी टाकाव्यात आणि त्यांच्याकडे असलेली बेकायदा शस्त्रे जप्त करावी. एरवी विरोधी पक्षातल्या लोकांच्या घरावर ईडीकडून किंवा इन्कम टॅक्स कडून जशा धाडी टाकल्या जातात, तशा धाडी महाराष्ट्रातील दाखलेबाज गुंडांच्या घरावर का टाकल्या जात नाहीत? महाराष्ट्रात जी बेकायदेशीर शस्त्रे आहेत ती बाहेर यायलाच हवीत. जर ती बाहेर आली नाही, तर आगामी निवडणुकीत लोकांचे मुडदे पडतील आणि याला जबाबदार केवळ सरकार असेल.

## राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी समन्वयाने काम करावे -कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा



**मुंबई/प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांमार्फत बेरोजगार युवक तसेच नवउद्योजकांच्या कल्पनांना चालना देण्यासाठी आणि नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार मिळावा यासाठी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले. हायलॅण्ड ग्राऊंड, ढोकाळी, माजीवाडा, ठाणे (पश्चिम) येथे कोकण विभागांतर्गत ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर, मुंबई शहर जिल्ह्यातील नोकरी इच्छुक युवक व युवतींकरिता राज्यस्तरीय 'नमो महारोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात स्टार्टअप एक्सपोमध्ये ४०० विविध औद्योगिक शासकीय व खाजगी संस्था सहभागी होणार असून हा मेळावा २४ आणि २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होईल.या मेळाव्यात नोकरी इच्छुक युवक-युवती यांनी मुलाखतीसाठी आणि महाएक्सपो मध्ये स्टार्टअप्स, इनव्हेस्टर्स व इन्क्यूबेटर्स या सर्वांना सहभागी व्हावे, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे. मंत्रालयातील परिषद सभागृह येथे राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळावा पूर्व तयारीबाबत बैठक झाली. बैठकीत मार्गदर्शन करताना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा बोलत होते. बैठकीला दूरदृश्य संवाद प्रणालीव्दारे कोकण विभागीय आयुक्त महेंद्र कल्याणकर, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके, ठाणेचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी संजय यादव, मुख्यमंत्री कार्यालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी बाळसिंग राजपूत, कौशल्य विद्यापीठाच्या कुलगूरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिंगाबर दळवी, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण मंडळाचे संचालक योगेश पाटील,नवी मुंबईचे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे उपआयुक्त दि.दे.पवास यासह इतर विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. कौशल्य विकास मंत्री श्री.लोढा म्हणाले की, या मेळाव्यात राज्यातील जास्तीत जास्त उमेदवारांनी आणि औद्योगिक संस्थांनी नावनोंदणी करावी यासाठी सर्व विभागांनी, स्थानिक प्रशासनाने याबाबत जनजागृती करावी. जास्तीत जास्त उद्योजक आणि विविध शासकीय आस्थापना यांनी याबाबत माहिती सर्वापर्यंत पोहोचावी यासाठी प्रयत्न करावेत. मेळाव्यासाठी उभारण्यात येणारे स्टॉल्स आणि रोजगार नोंदणी याबाबत स्थानिक प्रशासनाने आपल्या कार्यक्षेत्रातील औद्योगिक शासकीय व खासगी संस्था यांना देखील सहभागी करून घ्यावे. नमो महारोजगार मेळाव्यात जास्तीत नोकरीइच्छुक उमेदवार यांचा सहभाग वाढावा यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे.तसेच नमो महारोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने उभारण्यात येणाऱ्या सोयी सुविधांचा अशा सूचना त्यांनी केल्या.

**नमो महारोजगार राज्यस्तरीय मेळावा**

राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळाव्यामध्ये दहावी, बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवीधर, पदव्युत्तर, पदवी प्राप्त उमेदवारांच्या तेथेच मुलाखती घेत रोजगाराच्या संधी दिल्या जाणार आहेत. या मेळाव्यात नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. https://qr-codes.io/gdhSNd किंवा www.rojgar.mahaswayam.gov.in या लिंकवर जाऊन उमेदवार नोंदणी व नोकरीकरिता अर्ज करून प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहू शकतात. एका पेक्षा अधिक नोकरीसाठी देखील एकाच उमेदवाराला अर्ज करुन मुलाखत देता येतील. रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांनी मेळाव्याच्या अगोदर ही नोंदणी करणे आवश्यक आहे.जे उमेदवार मेळाव्याच्या अगोदर नाव नोंदणी करतील, त्याच उमेदवारांच्या मेळाव्याच्या दिवशी मुलाखती होणार आहेत.या माध्यमातून दोन लाख युवक आणि युवतींना रोजगार देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. यामुळे सर्व विभागांनी मिळून हा रोजगार मेळावा सर्वार्थाने यशस्वी करण्यासाठी कसून प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नमो महारोजगार मेळाव्याकरिता जास्तीत जास्त नोकरीच्या संधी उपलब्ध होण्याकरिता कौशल्य विकास विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तसेच उद्योग व कामगार विभाग यांना विविध कंपन्याशी संपर्क साधून रिक्त पदे अधिसूचित जाहीर करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत कोकण विभागांतर्गत ठाणे, पालघर, रायगड,सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर, मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापनांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या वेब पोर्टलवर उद्योजक नोंदणी करून रिक्त पदे अधिसूचित/जाहीर करणे आवश्यक आहे. याबाबत काही अडचण असल्यास संबंधित जिल्ह्यातील नोडल अधिकारी यांच्याशी किंवा १८०० १२० ८०४० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आदिवासी भागातील कुपोषण आणखी कमी करण्यासाठी सरपंचांनी सहभाग घ्यावा-मुख्यमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी**

आदिवासी भागातील पोषण आहार आणि आरोग्य सेवा सुधारण्यावर राज्य शासनाचे विविध विभाग समन्वयाने काम करीत असल्याने कुपोषणाचे प्रमाण कमी होताना दिसते. मात्र, कृती दलाच्या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करून हे प्रमाण आणखी कमी झाले पाहिजे असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याकामी सरपंचांचा सहभाग वाढविण्याचे आणि आदिवासी भागात मोठ्या प्रमाणावर शिबिरे घेण्याचे निर्देश दिले. आदिवासी क्षेत्रातील कुपोषण कमी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कृती दलाची बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांना कृती दलाचा पहिला अहवाल अध्यक्ष डॉ दीपक सावंत यांनी सुपूर्द केला. यावेळी अपर मुख्य सचिव (गृह) सुजाता सौनिक, महिला व बालविकास सचिव अनुपकुमार यादव आणि कृती दलातील विविध विभागांचे सचिव, अधिकारी उपस्थित होते. प्रारंभी विभागाने केलेल्या सादरीकरणात गेल्या तीन वर्षात आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण १.८२ टक्क्यांवरुन १.६२ टक्के इतके कमी झाल्याचे आणि उर्वरित राज्यातील कुपोषणाचे प्रमाण १.४३ टक्क्यांवरून १.२२ टक्के इतके कमी झाल्याची माहिती देण्यात आली. आरोग्य सेविका, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा स्वयंसेविका व आयुष यांच्या जोडीने सरपंचांशी देखील समन्वय साधून आरोग्य आणि पोषण सेवा देण्यात येत आहेत अशी माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, ग्रामविकासात सरपंचांची मोठी भूमिका असते. सरपंचांचे देखील आपापल्या गाव, पाड्यामधील कुपोषण कमी करण्यात सहभाग असणे गरजेचे आहे. चावडी वाचन, शिबिरे या माध्यमातून कुपोषित महिला, बालकांची माहिती वेळीच प्रशासनाला कळेल आणि त्यावर त्वरेने उपाययोजना करता येतील.

**माध्यान्ह भोजन आठवीपुढे सुद्धा**

सध्या आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजन देण्यात येते. ही योजना नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना देखील देण्यासंदर्भात तसेच अमृत आहार योजना शहरी भागात देखील देण्यासंदर्भात मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणण्याच्या सूचना देखील यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिल्या. कुपोषण ही गंभीर समस्या आहे. संबंधित सर्व विभागांनी एकत्रित समन्वयाने काम करून उचित पाऊले टाकली पाहिजे. कुपोषणात देशाच्या आकडेवारीत महाराष्ट्र सर्वात शेवटी हवा असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, यामध्ये आदिवासी भागात एखादी महिला गरोदर राहिल्यापासून तिचे आरोग्य, आहारावर सातत्याने आरोग्य, महिला व बालविकास विभागाने लक्ष ठेवणे गरजेचे आहे. लेक लाडकी योजनेविषयी देखील आदिवासी भागात चांगला प्रसार झाला पाहिजे. मेळघाट, पालघरप्रमाणे इतरत्रही दुचाकी रुग्णवाहिका किंवा नौका रुग्णवाहिका कायम तयार असल्या पाहिजेत. दुर्गम गावे आणि पाड्यांमध्ये किमान एखादे वाहन आपत्कालीन परिस्थितीत जाण्यायेण्यासाठी साधी वाट हवी यासाठी लवकरच वन विभागाची बैठक घेण्याच्या सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

**डेटा एकत्रित झाल्याने लाभ**

या कृती दलाने केलेल्या शिफारशींवर उत्तमरीत्या कार्यवाही झाल्याचे अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती सौनिक यांनी सांगितले. सर्व संबंधित विभाग प्रथमच एकत्र येऊन काम करीत आहेत, त्यामुळे त्यांच्यात योग्य समन्वय आहे. कुपोषित बालके व महिलांचा डेटा एकत्रित संकलित केला जात असल्याने वेळीच माहिती मिळत आहे.

**हिमोग्लोबिनकडे सातत्याने लक्ष देणे गरजेचे**

पोषणाचे व्हिडिओ आदिवासींच्या भाषेत भाषांतर करून प्रसारित करणे, पोषण ट्रेकरचे विश्लेषण करणे, अती तीव्र कुपोषित बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्रांचा सुधारित दर, मध्यम कुपोषित बालकांकडे देखील लक्ष देणे व त्यांना अतिरिक्त पोषण देणे, बालकांच्या पोषणाची चावडी वाचनाद्वारे माहिती देणे, आश्रमशाळेने एक नर्स, आणि क्रीडा शिक्षकाची नेमणूक करणे, किशोरवयीन मुलींच्या हिमोग्लोबिन तपासणीसाठी डिजिटल मीटर उपलब्ध करणे, गर्भवती महिलांना निमिया कमी करण्यासाठी लोहयुक्त गोळ्यांऐवजी एमएमएस देणे अशा शिफारशी करण्यात आल्याचे डॉ. सावंत यांनी यावेळी सांगितले. कृती दलाने केलेल्या काही सूचनांवर कार्यवाही झाली असून गरोदर स्त्रियांना देण्यात येणाऱ्या एकवेळच्या चौरस आहार दरात ३५ रुपयांवरून ४५ रुपये वाढ झाली आहे. मध्यम कुपोषित बालकांसाठी अतिरिक्त पोषण आहार कार्यक्रम सुरु झाला आहे. सरपंचांना देखील सहभागी करणे सुरु आहे, असे त्यांनी सांगितले.

## आपल्या घराचे स्वतः तीर्थंकर बना : प.पू. प्रविणऋषीजी म.सा.

कुठल्याही व्यक्तीला, दोषाला सुधारण्याचा प्रयत्न करणारी व्यक्ती, कडक अनुशासन करणारे गुरुजन, आई-वडील त्याला वाईट दिसतात हे वास्तव आहे. आपले ज्याच्याशी वैर आहे त्याविषयी आपण जेवढा क्रोध करत नाही तेवढा आई-वडील, सासू-सासरे यांच्याविषयी करतो. 'मारलेली थप्पड' लक्षात राहते मात्र प्रेमाने दिलेली थप्पी' हे लक्षात राहत नाही. त्यासाठी चांगले व्यक्तिमत्व घडवणाऱ्या व्यक्ती, गुरुजनांचा आदर करा, त्यांना सदाचारासाठी सहकार्य करा. आपले वर्तन सुधारणारे आणि बिघडवणारे आपणास भेटतात. त्यांच्याकडून आपण काय घेतो हे महत्त्वाचे आहे. करणे, करून घेणे हा खूप मोलाचा विचार आहे. चांगल्या धर्मगुरूंचा सहवास आपल्या जीवनात शांतीचा मार्ग दाखवतो. सजग, दक्ष असा शिष्य, मुलगा, सून मिळण्यासाठी कुणाच्या क्रोधाचे कारण न होता, क्रोध वाढेल असेल वर्तन करू नये, यातून विश्वात क्रोध नाहिसा होईल.

जो मृत्यूसाठी तयार होतो तोच मारण्यासाठी पुढे येतो, असा समाज आपण निर्माण करतोय मात्र क्षमा करणारे, नम्रता ठेवणारी पिढी तयार करू शकलो नाही. जीवनात कुणापुढे नतमस्तक व्हावे लागले तर विवेकपूर्ण व्हावे. आपल्या नजरेत दुसऱ्यांविषयी प्रेम, आपुलकी, कृपादृष्टी असावी त्यात क्रोधचा आवेश नसावा. चांगले करून घेण्याचे सामर्थ्य ज्यांच्यात आहे त्या श्रीकृष्णासारखे



सारथी बना. नाहीतर शकुनी ज्याठिकाणी बसतात त्याठिकाणी धर्मराजाकडूनही अघटित होऊन जाते.

धर्मगुरू, त्यांचे विचार ज्याठिकाणी असतात त्याठिकाणी एकमेकांचा तिरस्कार करणारेसुद्धा एकाच छताखाली शांत असतात. त्याप्रमाणेच प्रत्येक घरात आई-वडीलांनी ज्ञान, दर्शन समवशरण सहित तीर्थंकर बनले पाहिजे. आपली उपस्थिती इतकी सामर्थ्यशाली असली पाहिजे की न बोलतासुद्धा क्रोध शांत झाला पाहिजे. आई-वडीलांचे हात मुलांच्या डोक्यावर आशिर्वादासाठी असावे ते शुभंकर' की भयंकर' हे स्वतः ठरवावे. ज्या क्षणावेळी सूखाची सृष्टी निर्माण करता येऊ शकते त्या क्षणांना भयभीत केले जाते तशी कृती आपल्याकडून घडते. आपण फुलांना जवळ ठेवायचे की काट्यांना हे प्रत्येकाने स्वतः ठरवले पाहिजे. घरात तीर्थंकर, चक्रवती, वासुदेव याप्रमाणे आचरण केले पाहिजे. आपण दीपक बनावे डायमंड नाही. दिपकप्रमाणे ऊर्जावान बनावे ज्याने उत्तम समाज घडेल.

वृक्षसुद्धा फळं देते आणि कर्मसुद्धा, वृक्षाचे फळं देतात वृक्षांकडून आलेल्या फळाची चव आपण घेऊ शकतो मात्र कर्माचे फळ हे आपल्याजवळ नसते याचे भान ठेवावे. लेश्या शुध्द असावी, द्रव्य लेश्या त्यात वर्ण, गंध, रस, स्पर्श आहे आणि भव लेश्या त्यात ज्ञान, दर्शन, चरित्र आहे. भाव लेश्या चिरंतन असते तर द्रव्य लेश्या ही दृश्यस्वरूपाची असते. त्यामुळे घरातील अस्तित्व त्या घराचे भाग्य बदलवित असते. दुधात मीठ टाकले तर ते खराब होते मात्र तेच मीठ जर दही, ताक मध्ये टाकले तर त्याचा स्वाद वाढतो त्याप्रमाणे आई-वडीलांचे कार्य आहे.' असे श्रमणसंघीय उपाध्याय प्रवर पूज्य गुरूदेव प्रवीणऋषीजी म. सा. यांनी सांगितले.

रतनलाल सी बाफना स्वाध्याय भवन येथे 'ब्लिस फूल कपल कॅम्प'चे आयोजन केले असून आनंदी दाम्पत्य शिबीरात ते बोलत होते. दि. ६ फेब्रुवारीपर्यंत सकाळी ९ ते १० यादरम्यान वैवाहिक जीवनातील सहयात्रेचे लक्ष्य आणि रहस्य समजावून ध्यान, ज्ञान, चारिद्र्य आणि नातेसंबंधावर प्रकाश टाकला जात आहे. या कार्यशाळेत सर्वानी अवश्य सहभागी व्हावे असे आवाहन 'श्री संघा'तर्फे करण्यात आले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

12 TO 18 FEBRUARY 2024 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 2/10/2024 8:31 PM Page 1



# आठवडी बाजारात पॉकेट मारणाऱ्या आरोपीला मुरुडमध्ये अटक



**लातूर/प्रतिनिधी**

गर्दीचा फायदा घेऊन बसस्थानकावर व आठवडी बाजारात लोकांच्या खिशा मधील पैसे चोरणाऱ्या आरोपीला पकडण्यात मुरुड पोलीस यश आले आहे. याप्रकरणी सदर आरोपी विरोधात मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुरुड येथे भरत असलेल्या आठवडी बाजारात पाकीटमारांचा वावर वाढल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या अनुषंगाने संशयित पाकीटमाराचा माग काढण्यासाठी मुरुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकटेश अलेवर यांनी पोलिसांचे एक पथक तयार केले होते.दरम्यान ७ फेब्रुवारी २०२४ रोजी मुरुड येथे आठवडी बाजार असल्याकारणाने पंचक्रोशीतील व्यापारी व नागरिक मोठ्या प्रमाणात मुरुड शहरात दाखल झाले होते. त्यामुळे नागरिकांची मोठी गर्दी होते. याचाच फायदा घेऊन जिल्ह्याबाहेरील गुन्हेगार गुन्हे करण्यासाठी गर्दीच्या ठिकाणी शहरात येतील याचा अंदाज पोलिसांनी बांधला होता . मुरुड पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक व्यंकटेश अलेवार यांनी पोलीस पथकाला योग्य त्या सूचना करून आठवडी बाजार व बसस्थानकात साध्या पोशाखात तैनात केले होते. सदर पथके गर्दीतील गुन्हेगारावर लक्ष ठेवून होते.तेव्हा एका इसमाच्या हालचालीवर संशय आल्याने पोलीस पथकाने त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव प्रवीण अनिल जाधव, वय २२ वर्ष, राहणार खोकरमोहा, तालुका शिरूर जिल्हा बीड. सध्या राहणार गांधीनगर, बीड. असे असल्याचे सांगितले. ज्या नागरिकाच्या खिशातून सदरचे पाकीट काढण्यात आले होते त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नमूद आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात नमूद आरोपीला अटक करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे मुरुडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकटेश आलेवार यांचे नेतृत्वात पोलिस अमलदार तिगीले, सूर्यवंशी, रवी कांबळे, अनिल शिंदे, खोपे, राठोड, माने, हाबे, आत्राम बोईनवाड, महेश पवार यांनी केली आहे.

# विश्वजित मित्र मंडळातर्फे दहावी मार्गदर्शन शिबिर संपन्न



**वसई/प्रतिनिधी**

विश्वजित मित्र मंडळातर्फे दहावी परीक्षा देर्णाया विदयार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. विदयार्थ्यांसाठी परिक्षेच्या पूर्वतयारी हेतू विविध उपक्रम मंडळातर्फे राबविले जातात. सालाबादाप्रमाणे यंदाही विश्वजित मित्र मंडळाने दहावी S.S.C मराठी/इंग्रजी माध्यम विदयार्थ्यांसाठी दि.२१ जानेवारी २०२४ व २८ जानेवारी २०२४ रोजी सराव परीक्षेचे आयोजन केले होते. दहावीचे वर्ष हे विदयार्थांसाठी महत्वाचे असून त्यांना अभ्यासाचे दडपण सुद्धा असते. अशा वेळी अभ्यासाचे दडपण कमी करण्यासाठी सराव परीक्षांची मदत होते. विविध शाळेतील १२० विद्यार्थी या सराव परिक्षेला उपस्थित होते. तसेच रविवार दि. ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी आर.पी.वाघ. हायस्कुल, वसई येथे दहावी विदयार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले. यावेळी राहुल मिश्रा (गणित विषय) व रूपल मेहेर (सायन्स विषय) या तज्ञ शिक्षकांनी यावेळी मराठी व इंग्रजी माध्यमाच्या सुमारे १२० विद्यार्थ्यांना सहज व सुंदर भाषेत गणित व सायन्स या विषयावर मार्गदर्शन केले. प्रत्येकी दोन तास चाललेल्या या कार्यक्रमात विदयार्थ्यांनी आपल्या समस्या व शंका शिक्षकांसमोर मांडल्या. दहावी परीक्षेची तयारी, परीक्षा नियोजन व विद्यार्थांच्या शंकेचे निरसन अशा विविध बाबींवर मार्गदर्शन केले. यावेळी मंडळाने घेतलेल्या सराव परिक्षेचे तपासलेले पेपर्स विद्यार्थांना देण्यात आले. विश्वजित मित्र मंडळाच्या शैक्षणिक उपक्रमात आपले मार्गदर्शन व सहकार्य देणाऱ्या राहुल मिश्रा, अनुजा सामंत व गुरूकृपा विद्यानिकेतनचे नाईक, केतन श्रेता, प्रिती सावे व वैष्णवी पाटील शिक्षकांचा मंडळाचे सचिव प्रशांत मडकईकर यांनी आभार मानले व आपले सहकार्य असेच पुढेही मिळत रहावे तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष संतोष वळवईकर यांनी केले.

विश्वजित मित्र मंडळातर्फे दहावी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वजित मित्र मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

## 'जमीन सुधारणा कायदा' विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान

वसई : वसई येथील विद्यावर्धिनी शिक्षणसंस्था संचालित अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या ग्रामीण विकास विभागातर्फे जमीन सुधारणा कायदा या विषयावर विशेष व्याख्यान ठेवण्यात आले होते. ॲड. गावंड यांनी या व्याख्यानात जमीन सुधारणाविषयक विविध कायद्यांची आणि त्यांच्या महत्त्वाच्या पोटकलमांची ओळख उपस्थित विद्यार्थ्यांना करून दिली. सातबारा कशाप्रकारे बनवला जातो, कुळ कायदा म्हणजे काय, गाव नमुना आणि फेरफार याविषयी थोडक्यात माहिती दिली. तसेच त्यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सातबारा उतारे, गाव नमुना व फेरफार यांचे नमुने दाखवले.

# औसा येथील रुपामाता मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**औसा/प्रतिनिधी**

येथील रूपा माता उद्योग समूह अंतर्गत रूपामाता मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटीचा १० वर्धापन दिनानिमित्त औसा शाखेमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सोसायटीचे संचालक रंगनाथ कदम यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी नागेश मुगळे, चांगदेव माळी, श्रीकांत कल्याणी, राम आंबेकर, शिवशंकर कल्याणी, अजय सबनीस, विठ्ठल चव्हाण, विश्वास आवटी, शिवाजी सातपुते, सिद्धेश्वर दळवे, संजय जंगले, गोविंद बुरांडे, औसा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष काशिनाथ सगरे, पत्रकार शिवाजी मोरे, राम कांबळे, गिरिधर जंगाले आदी मान्यवरांच्या उपस्थित होते. पतसंस्थेचे शाखा व्यवस्थापक किशोर जगाले, विश्वस ओटी यांनी मान्यवरांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी शाखा व्यवस्थापक किशोर जगाले, दीपक ढोक, श्रीराम मोरे, अमर सावंत, पृथ्वीराज चव्हाण, अनुसया सोमवंशी, प्रशांत सावंत इत्यादी कर्मचारी व ठेवीदार सभासद उपस्थित होते.



# शिक्षण हा महिला सक्षमीकरणाचा प्रमुख आधारस्तंभ -गोविंदराव भोपणीकर



**देवणी/प्रतिनिधी**

शिक्षण हा महिला सक्षमीकरणाचा प्रमुख आधारस्तंभ असून शिक्षणाने माणसाला विवेकबुद्धी जागृत होते आणि शिक्षणातून महिला सक्षमीकरणाची सुरुवात होते असे प्रतिपादन गोविंदराव भोपणीकर यांनी केले. कै. रसिका महाविद्यालयातील युवती कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या महिला सशक्तीकरण व सबलीकरण या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून अनिता येलमटे, महिला उद्योजक अर्चनाताई पैके यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक असणारे महत्त्वाचे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास माहविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, सुप्रिया कांबळे मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. अंकुश भुसावळे यांनी बचतीचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवती कल्याण मंडळ प्रमुख प्रा. डॉ. एस. एस. डेंगाळे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. वैशाली चटगे यांनी केले. आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील युवतीसह देवणी तालुक्यातील महिला शिक्षिकांचीही उपस्थिती होती.

# पालघर येथे २० फेब्रुवारीला महिला लोकशाही दिन


**पालघर/प्रतिनिधी**

समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण उपलध्ब करून देण्याच्या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच या महिन्याचा महिला लोकशाही दिन दि. २० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, येथे आयोजित करण्यात आला आहे. महिला लोकशाही दिनाचा अर्ज जिल्हाधिकारी यांना उद्देशून असावा. तसेच तालुका महिला लोकशाही दिन टोकन क्र. व तहसिलदारांच्या उत्तराची प्रत अर्जा सोबत जोडण्यात यावी. महिला लोकशाही दिनी घ्यावयाची तक्रार, अडचण सोडविण्यासाठी अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, कक्ष क्र. १०८, पहिला मजला, प्रशासकीय इमारत अ, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कोळगाव रोड, पालघर येथे करावा.संपर्कासाठी ई-मेल-वुलवेरिश्रिसहरीसारळश्र.लो दूरध्वनी क्र ०२५२५-२५७६२२ यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुरव्यासह सादर करावे. असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

# राष्ट्रीय महामार्गावर रसायन वाहून नेणारा टँकर उलटून अपघात

**बोईसर/प्रतिनिधी**

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर बुधवार ७ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७.४० वाजता धानीवरी ते विवळवेढे दरम्यान मुंबई वाहिनीवर बोईसर येथील एका कंपनी मध्ये लागणारे रसायन (केमिकल) वाहून नेणारा टँकर उलटून अपघात झाला आहे. यामधील रसायन गळती झाली असून रस्त्यावर वाहून गेले आहे. प्रथम दर्शनी टँकर मध्ये अमोनिया असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत असून परिसरात सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. महामार्गावर सध्या काँक्रीटी करण्याचे काम सुरू असल्यामुळे अनेक ठिकाणी पर्यायी रस्ते देण्यात आले आहेत. दरम्यान टँकर चालकाला रस्त्याचा अंदाज न आल्यामुळे अपघात घडल्याचे सांगितले जात आहेत. वाहनांमध्ये फक्त चालक असून त्याला कुठल्याही प्रकारची दुखापत झालेली नाही. सतर्कतेच्या दृष्टीने डहाणू येथून नगरपरिषद आणि अदानी थर्मल पॉवर स्टेशनच्या अग्निशामक दलांना पाचारण करण्यात आले होते. या रसायनाला उग्र वास आणि जवळ गेल्यास डोळ्यांना जळजळ येत असल्यामुळे प्रथम दर्शनी टँकर मध्ये अमोनिया असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. कासा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत चालक आणि मालकाकडे चौकशी केली असता रसायन अमोनिया नसून स्पेंट असिड असल्याचे स्पष्ट केले. सध्या पोलिसांकडून रस्त्यावरील टँकर बाजूला काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.



## महा-ई सेवा केंद्रांचे गैरव्यवहार उघडकीस; केंद्रे सील करण्याची मागणी

वसई : वसईतील महा ई सेवेच्या कारभारावर तसेच त्यांच्या विश्वासहर्तेवर प्रश्नचिन्ह लागलं असून या केंद्रा मधून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार उघडकीस येत आहेत. त्यामुळे वसईतील सर्वच केंद्रांची झाडझडती होणे आवश्यक आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. नालासोपारा पूर्व पश्चिम, वालीव भागात महा ई सेवा केंद्रे आहेत. यातून विविध दाखले, आधारकार्ड, तसेच महानगर पालिकेच्या अनधिकृत घरपट्ट्या सुद्धा याच केंद्रात बनवल्या जात असल्याच्या तक्रारी वसई तहसीलदार कार्यालयात दाखल झाल्या आहेत. यामध्ये गोर गरीब जनता व प्रशासनाची फसवणूक केली जाते. या केंद्र चालकांनी या माध्यमातुन मोठ्या प्रमाणात अवैध माया जमवली आहे. याची चौकशी करण्यास तहसील प्रशासन स्वारस्य दाखवत नाही. त्यामुळे केंद्र चालक व संबधित अधिकारी यांचे साटे लोटे असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याबाबत अश्या स्वरूपाची केंद्र तात्काळ सील करण्याची मागणी समाजसेवक श्लोक पेंढारी यांनी तहसीलदार, वसई यांच्याकडे केली आहे. कारवाई न झाल्यासलोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येणार असल्याच्या इशारा दिला आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग,**
**सुर्यानगर ता.डहाणू जि.पालघर यांचे कार्यालय**

Email ID: eepipcdgmail.com

## दरपत्रक सुचना क्र. १ सन २०२३-२४

कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर व अंतर्गत उपविभाग कार्यालयासाठी भाडे तत्वावर वाहन पुरविणे करीता कंपनी / संस्था / कंत्राटदार व खाजगी वाहन यांचे कडुन दिनांक ०९/०२/२०२४ ते दिनांक २३/०२/२०२४ रोजी सायंकाळी १४:०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. प्राप्त दरपत्रके कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर कार्यालयात पोष्टाने किंवा सक्षम हस्ते पाहोच होतील अशा बेताने पाठवावीत. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके कार्यालयात पोहोचण्याचा अंतिम दिनांक २६/०२/२०२४ असून शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील.

| अ.क्र. | भाडेतत्त्वावर गाडी पुरविणेचे काम | वाहनांचा प्रकार | परिमाण | ३०/३१ दिवस/ २००० कि.मी. पर्यंत मासिक दर | २००० कि.मी. पेक्षा अतिरिक्त वाहन चालविल्यास अतिरीक्त दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प, बांधकाम विभाग, सुर्यानगर, ता.डहाणू, जि.पालघर | स्कॉर्प्रिओ / ईर्टिगा | ०१ नग | | प्रति कि.मी. रु. दर |

**अटी व शर्ती :**

१) पुरवठा करण्यात आलेले वाहन हे सुस्थितीत असावे.
२) सदरील वाहन हे मासिक भाडेतत्वावर तात्पुरते स्वरुपात रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारावर घेण्यात येणार आहे.
३) सदरील वाहन हे आवश्यक अद्यावत कागदपत्रासह (आर.सी. बुक/विमा/पी.यु.सी.. तसेच वाहन चालकाचा परवाना व इतर कागदपत्रे) या सोबत असावेत.
४) सदरील वाहनाचे दर हे वाहन चालकाचे वेतन व वाहनाचे इंधन, वंगण, दुरुस्ती इत्यादी बाबी तसेच सर्व करासंह समाविष्ट असावेत.
५) सदरील वाहन हे पाच वर्षांपेक्षा जुने नसावे.
६) वरिल काम पुरवठादाराने आपल्या स्वतःचे जबाबदारीवर करावयाचे आहे. त्याकरिता अपघात सुरक्षीतता इत्यादी काढण्याची जबाबदारी पुर्णपणे संबधित ठेकेदाराची राहील. तसेच सदरील वाहन हे शासकिय कामावर कार्यरत असताना काही विपरीत उद्भवल्यास त्यास वाहन मालक भरपाईस जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.
७) सदरील वाहनाचे देयक हे प्रति माह प्रमाणे देयक प्राप्त झाल्यानंतर अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल. तसेच देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्याबाबत कोणतीही नुकसान भरपाई अथवा व्याजाची मागणी करता येणार नाही. शासकिय कर कपात करुन रक्कम पुरवठादाराच्या बँक खात्यावर अदा केले जाईल.
८) दरपत्रकात नमुद केलेल्या दराव्यतीरिक्त कोणतेही अतिरक्ति देय राहणर नाही.
९) वाहन चालकाने कोणतेही शासकिय नियमांचे उल्लंटघन केल्यास त्यास शासकिय नियमाप्रमाणे वाहन मालकास जबाबदार धरण्यात येईल व शासनाची हानी / नुकसान देयकातून वजा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
१०) वरिल प्रमाणे दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचे / रद्द करण्याचे पुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
११) वाहनास प्रति सप्ताह एक दिवस सुट्टी राहील. परंतु आवश्यकते नुसार वाहन चालकास सुट्टीच्या दिवशी देखील काम करावे लागेल.
१२) सदर सेवा ही पूर्णपणे कंत्राटी तात्पुरत्या स्वरुपाची असुन भविष्यात आपलेच वाहन लावण्यास कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही.
१३) दरपत्रके देताना आपले दर सर्व करांसह नमूद करावे. देयकाचे भुगतान करताना देयकातुन नियमाप्रमाणे कर वजा केला जाईल.
१४) वाहन चालकाने कामावर असताना नशापान / धुम्रपान / तंबाखु जन्य पदार्थांचे सेवन करु नये.
१५) सदर करारनामा कार्यारंभ आदेशापासून अमलात येणार आहे व तो पुढील आदेशापर्यंत ग्राह्य राहील.
१६) वाहनाचा अपघात झाल्यास व दुर्देवाने वाहनाचे कोणत्याही स्वरुपाची वा गंभीर नुकसान झाल्यास नुकसानभरपाईचे कोणतेही दायित्व शासनाकडे असणार नाही. त्याची जबाबदारी संबंधीत कंपनी / संस्था /कंत्राटदार व खाजगी वाहन यांची राहील.
१७) कंपनी / संस्था /कंत्राटदार व खाजगी वाहन काम करण्याऱ्या वाहनचालकांच्या सेवेची कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही.
१८) शासनाच्या आवश्यकतेनुसार वाहनाची मागणी केली जाईल. मागणी केलेल्या कालावधीसाठी वाहन उपलब्ध होऊ शकत नसेल. अशा वेळी पर्यायी व्यवस्था कंपनी / संस्था /कंत्राटदार व खाजगी वाहन करेल.
१९) कराराचे पालन समाधान कारक न झाल्यास करार केंव्हाही संपूष्टात आणणे किंवा कराराची मुदत वाढविणे या बाबतचा निर्णय कोणत्याही अटी व शर्ती शिवाय कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर व त्यांचे वरीष्ठ कार्यालयाने सुचविल्यानुसार राहील.
२०) कर्तव्यावर असताना वाहन चालकाची वागणूक शिष्ट संमत असेल. उदा. वाहनचालकाने वाहतुकीचे नियम पाळणे, वागणूक सौजन्याची ठेवणे, वाहनाजवळ वाहकाने उपलब्ध असणे इत्यादी.
२१) शासकिय गोपनियता अबाधीत राहील याची दक्षता कंपनी / संस्था /कंत्राटदार व खाजगी वाहन घेईल.
२२) आपल्या वाहनाची व असेसेरीजची काळजी / देखभाल करावी. त्याचे नुकसान झाल्यास कंपनी / संस्था /कंत्राटदार व खाजगी वाहन यांची जबाबदारी राहील, शासन जबाबदारी उचलणार नाही.
२३) पुरवठादाराच्या कोणत्याही अटि व शर्ती ग्राह्य राहणार नाहीत.
२४) दरपत्रक मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर यांनी राखुन ठेवला आहे.

जा.क्र. : पापाप्रबांवि/सुर्या/भांशा/२१५/सन २०२४
पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर ता. डहाणू, जि. पालघर
दिनांक : २९/०१/२०२४

सही/-
(दि.श्री. शेवाळे)
कार्यकारी अभियंता,
पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग,
सुर्यानगर, ता.डहाणू, जि. पालघर

जिमाका/पालघर/जाहि २६३/८४/२०२४ दिनांक : ०६/०२/२०२४

# सोलापूर जिल्ह्यात चार गावात टँकरने पाणीपुरवठा सुरू

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यात उन्हाचा कडाका जाणवू लागला असून सद्यस्थितीत माळशिरस तालुक्यातील दोन व करमाळा आणि माढा तालुक्यातील प्रत्येकी एक अशा चार गावात टँकरने पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिली. सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी बुधवारी दुष्काळी परिस्थितीतील पाणीटंचाई व जलजीवन मिशन योजनेच्या कामाचा आढावा घेतला. टंचाई काळासाठी पाणी टंचाई आराखडा तयार करण्यात आला आहे. पाणीटंचाई निवारणासाठी ऑक्टोबर २०२३ ते जून २०२४ पर्यतच्या आराखड्यास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मंजुरी दिली आहे. या आराखड्यात नऊ उपायोजना सुचविल्या आहेत. त्यासाठी ५५ कोटी ६२ लाखाच्या किमतीचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये १२४१ टँकरसाठी ४३ कोटी ८५ लाख इतका निधी लागणार आहे. टंचाई स्थितीमुळे गावांमध्ये पाणीटंचाई जाणवू लागली आहे. सद्यः स्थितीत माळशिरस तालुक्यातील पिंपरी, भांब व करमाळा तालुक्यातील घोटी, माढा तालुक्यातील तुळशी अशा चार गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू केला आहे.



जल जीवन हा केंद्र शासनाचा महत्त्वकांक्षी कार्यक्रम आहे. हर घर नल से जल योजनेतून प्रत्येक घरास नळाद्वारे ५५ लिटर प्रतिमाणशी प्रतिदिन पाणीपुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे. जल जीवन साठी चालू वर्षासाठी ८३४ कोटीच्या आराखड्याला मंजुरी मिळाली आहे. जिल्ह्यात ५ लाख ७६ हजार ६९१ कुटुंबापैकी डिसेंबर २३ अखेर ५ लाख ६२ हजार ८८८ कुटुंबांना नळ जोडण्याच्या संकेतस्थळावर नोंदी करण्यात आल्या आहेत. चालूवर्षी ७५ हजार ३१४ नळ जोडण्याचे उद्दिष्ट असून त्यापैकी ६१ हजार ६४४ जोडण्या देण्यात आल्या आहेत. जलजीवन मिशन योजनेत झेडपीच्या आराखड्यात ८५५ योजनांचा समावेश असून या सर्व योजनांच्या निविदा व कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. यातील १०१ कामे पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. या योजनेसाठी केंद्र व राज्याच्या वाट्यातील १२४ कोटी ७७ लाख कोटी निधी प्राप्त झाला आहे. यातील ११९ कोटी १५ लाख खर्च झालेले आहेत. चालू वर्षात ८३४ कोटीचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. हर घर नल से जल नळ जोडण्यासाठी ३७४ कामे मंजूर असून सद्यस्थितीत प्रशासकीय मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. चालू आर्थिक वर्षात १५४ कामे नव्याने घेण्यात आली असून त्यातील १५२ कामे प्रगतीपथावर आहेत. इलेक्ट्रिशियनअंतर्गत ४२३ कामात शासनस्तरावरून मान्यता मिळाली असून १६० कामे पूर्ण करण्यात आली आहेत. जलजीवन योजनेतून २४ कामांना सोलार पंपाद्वारे पाणीपुरवठा करण्यास मान्यता मिळाली असून त्यातील १३ कामे पूर्ण आहेत तर ४ कामे रद्द करण्यात आली आहेत. नमामी योजनेअंतर्गत तीन कामास मान्यता मिळाली असून ही कामे प्रगतीपथावर आहेत. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत आराखड्यात २७ कामांचा समावेश असून त्यापैकी २६ कामे पूर्ण झाली आहेत. एक काम रद्द झाले आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेय जल योजनेतून १९९ योजनांचा समावेश केला असून त्यातील १९४ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत, असे मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी सांगितले. टंचाई काळात कोणतीही अडचण भासणार नाही, असे कामाचे नियोजन करा अशा अधिकाऱ्यांना त्यांनी सूचना दिल्याचे सांगितले.

# वसई-विरार महापालिकेची प्लास्टिक विरोधी मोहिम सुरु



**विरार/प्रतिनिधी**

प्लास्टिक हटाव ही मोहिम शासकीय स्तरावर सुरु असली तरी तिची प्रभावी अंमलबजावणी क्वचितच होते. मात्र वसई-विरार महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाने एकल प्लास्टिक विरोधातील मोहीम पुन्हा एकदा तीव्र केली आहे. या मोहिमेंतर्गत प्रभाग समिती जी मधील एका व्यापारी गाळ्यावर नुकतीच धाड टाकण्यात आली. या कारवाईत ४०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या असून व्यापारी शैलेंद्र कुमार शर्मा यांच्याकडून २५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहायक आयुक्त सुकदेव दरवेशी यांनी आयुक्त अनिलकुमार पवार, अतिरीक्त आयुक्त अजिंक्य बगाडे व उपायुक्त चारुशीला पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई केली. महाराष्ट्र सरकारच्या २३ मार्च २०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार, राज्यात एकल वापर प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घातलेली आहे. त्यानुसार व्यापारी, दुकानदार, फेरीवाल्यांना प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करण्याबाबतच्या सूचना महापालिकेने केल्या आहेत. त्यानंतरही सर्रास प्लास्टिक पिशव्या व थर्माकॉलची उत्पादने विक्रीत दिसून आली आहेत. या विरोधात महापालिकेचा घनकचरा व्यवस्थापन विभाग वेळोवेळी प्लास्टिक पिशव्या व थर्माकॉल उत्पादन जप्ती व दंडात्मक कारवाई करत आहे. तरी व्यापारी, दुकानदार एकल प्लास्टिक पिशव्या वितरण व विक्री करत आहेत. फेरीवाले, फळभाज्या विक्रेतेही कमी जाडीच्या पिशव्यांची विक्री करत असल्याचे आढळल्याने ही कारवाई करण्यात येत असल्याचे समजते.

# किणीकर विकास प्रतिष्ठानतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन



**अंबरनाथ/सुनील तांबे**

अंबरनाथमध्ये कल्याण लोकसभेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसाचं औचित्य साधून डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि किणीकर विकास प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून अंबरनाथ मध्ये रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. अंबरनाथ विधानसभेचे आमदार डॉ.बालाजी किणीकर यांच्या माध्यमातून या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. अंबरनाथच्या महात्मा गांधी विद्यालयाच्या सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. या मेळाव्यात ७० पेक्षा जास्त नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला होता.अंबरनाथ, उल्हासनगर आणि बदलापूर या शहरातील जवळपास ५०० उमेदवारांनी रोजगार मेळाव्यात नोकरीसाठी नोंदणी केली तर १०० पेक्षा जास्त उमेदवारांना मेळाव्यातच रोजगाराची संधी प्राप्त झाली. रोजगारा व्यतिरिक्त ब्युटी पार्लर, हॉटेल मॅनेजमेंट, नर्सिंग कोर्स, इलेक्ट्रिशन यासारख्या कोर्स मोफत शिकण्याची संधी यावेळी उमेदवारांना मिळाली.या वेळी आमदार बालाजी किणीकर, मा. न. अध्यक्ष सुनील चौधरी, शिवसेना उपशहर प्रमुख परशुराम पाटील, मा. नगरसेवक सुभाष साळुंखे तसेच सेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीदत्तप्रकाश प्रतिष्ठान चॅम्पियन क्रिकेट ट्रॉफी २०२४ पर्व तिसरे वसईत संपन्न

**विरार/प्रतिनिधी**

श्रीदत्तप्रकाश प्रतिष्ठान-झिंबरे परिवार देवाचे गोठणे या सामाजिक संस्थेतर्फे ग्रामीण भागातून उदरनिर्वाहासाठी मुंबईमध्ये स्थायिक असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथील देवाचे गोठणे गावातील क्रिकेट खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी रविवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२४ रोजी वसई पश्चिम येथील सनसिटी मैदानावर मर्यादित षटकांचे ओव्हर आर्म्स टेनिस बॉल श्रीदत्तप्रकाश प्रतिष्ठान चॅम्पियन क्रिकेट ट्रॉफी-२०२४ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेच्या आयोजनासाठी संस्थेला झिंबरे युवा मंच, दत्तगुरु विठोबा क्रिकेट क्लब, न्युमेक्स ब्लॉक्स (इंडिया) प्रा.लि.तर्फे नितीन पाटील, ह्याबिट वेलनेस प्रा. लि. तर्फे मनमोहन बागडी, शान हॉलिडेज, तसेच मनमोहन शर्मा, अभय रमाणी, कमल बंगा आणि विश्वास राघव, श्रीकांत कोटियन इत्यादी समाजसेवक आणि क्रिकेट प्रेमी यांच्याकडून विशेष सहकार्य लाभले. सदर स्पर्धेत एकूण चौवीस क्रिकेट संघाना खेळण्यासाठी संधी देण्यात आली. विजेत्या संघाना संस्थेतर्फे आकर्षक भव्य चषक आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. श्रीदत्तप्रकाश प्रतिष्ठान चॅम्पियन क्रिकेट ट्रॉफी-२०२४ पर्व ३ रे चे विजयी मानकरी खालीलप्रमाणे आहेत.




अंतिम विजेता संघ दत्तगुरु विठोबा क्रिकेट क्लब (डी.बी.सी.सी.)-उंबरवाडी, उपविजेता संघ - डी.एम.सी.सी. (ब) - कातळीवाडी, तृतीय क्रमांक- बी.सी.सी. देऊळवाडी, शिस्तबद्ध संघ- मोरया क्रिकेट संघ - केळंबेकरवाडी, मालिकावीर- केदार कांबळी, सामनावीर- केदार कांबळी, सिक्सर किंग -केदार कांबळी, उत्कृष्ट फलंदाज - अनिकेत ठोंबरे, उत्कृष्ट गोलंदाज - तुषार बाणे, सदर स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार अरविंद बनसोडे, संपादक- पत्रकार आकाश पोकळे, विश्वासराव राघव गावप्रमुख गोठणे दोनिवडे, तसेच विनायक शिंदे- अध्यक्ष देवाचे गोठणे रिफायनरी विरोधी कमिटी, तसेच मिलिंद राऊत वाडीप्रमुख राऊतवाडी उपस्थित होते. सदर स्पर्धेसाठी झिंबरे परिवार झिंबरे युवा मंच यांच्यातर्फे ॲड.संतोष द. झिंबरे, सुभाष अनंत झिंबरे, सुनील अनंत झिंबरे, तुषार नरेंद्र झिंबरे, रामदास आत्माराम झिंबरे, नरेंद्र भिकाजी झिंबरे, निवृत्ती प्रकाश झिंबरे, विनोद वामन झिंबरे, जयदास झिंबरे, हसमुख झिंबरे, रमेश झिंबरे, अनिल झिंबरे, कु. समृद्धी झिंबरे, रोहित झिंबरे, अमन झिंबरे, विकास झिंबरे, सुभाष ता. झिंबरे, चैतन्य झिंबरे, प्रवीण झिंबरे, प्रथमेश झिंबरे, वैभव अधिकारी, कैलास नवाळे, अमोल केळंबेकर, प्रथमेश राघव, किरण बाणे, राजेश वाडेकर, नंदकुमार नवाळे, विलास नाचणेकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

श्रीदत्तप्रकाश प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेतर्फे मागील अनेक वर्षांपासून अनेक सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. शैक्षणिक, क्रीडा, वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात सदर संस्था कार्यरत असून आतापर्यंत अनेक उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात आले आहेत. अनेक समाजप्रेमी यांच्या सहकाराने संस्थेचे कार्य चालू आहे.

# मराठा मागासलेपण सर्वेक्षण पूर्ण!

**वसई/प्रतिनिधी**

राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे सर्वेक्षण सुरु होते. ते आता संपले आहे. वसई-विरारमध्ये या सर्वेक्षणाच्या कामाला वेग आला होता. त्यामुळे १०० टक्के सर्वेक्षण शहरात पूर्ण झाल्याचे झाल्याचे समजते. संपूर्ण राज्यासह वसई विरार हद्दीत पालिकेतर्फे मराठा समाजातील नागरिकांचे सर्वेक्षण २३ जानेवारीपासून सुरू करण्यात आले होते. ३१ जानेवारी ही सर्वेक्षणाची शेवटची मुदत होती. मात्र सर्वेक्षण पूर्ण न झाल्याने २ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

वसई विरार महापालिकेचे कर्मचारी आणि स्वयंसेवक यासाठी प्रत्यक्ष घरी जाऊन सर्वेक्षणाचे काम करत होते. यातून मराठा समाजाची आर्थिक स्थिती आणि त्यांची संख्या समोर येणार आहे. सर्वेक्षणाच्या सुरुवातीला पहिल्या चार दिवसांत २ लाख घरांचे सर्वेक्षण वसई विरारमध्ये करण्यात आले होते. मात्र बंद असलेली घरे, सर्वेक्षणास दिला जाणारा नकार तसेच तांत्रिक अडचणी येत असल्याने सुरुवातीला धीम्या गतीने सुरू असलेल्या सर्वेक्षणाला पाच दिवसानंतर वेग आला होता. या सर्वेदरम्यान ४ टक्के म्हणजेच ३२ हजार निर्लेखित घरे आढळून आली आहेत. ४ टक्के कुटुंबांनी सर्वेक्षणास नकार दिला तर १३ टक्के बंद घरेदेखील आढळून आली आहेत. सलग दोन वेळा बंद घरांना भेटी दिल्यानंतरही बंद अवस्थेत असलेल्या घरांना चिन्हांकित करण्यात आल्याचे पालिकेने सांगितले. पालिकेतर्फे १ हजार ३८९ कर्मचारी आणि स्वयंसेवक प्रत्यक्ष सर्वेक्षणात होते. प्रभाग सी, ई, एफ, जी, एच आणि आय या प्रभागाचे सर्वेक्षण पूर्ण झाले होते. तर शिल्लक प्रभागात दिलेल्या मुदतीत सर्वेक्षण पूर्ण केले. बंद घरे, निर्लेखित मालमत्ता सर्वेक्षणास नकार दिल्यामुळे ८ लाख ७१ हजार ८७९ वुटुंबांपैकी प्रत्यक्ष ६६ लाख ८२ हजार ४४४ घरांचे सर्वेक्षण झाल्याची माहिती वसई-विरार महानगरपालिकेने दिली.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचारप्रकरणी पेल्हार पोलिसांनी आरोपीच्या आवळल्या मुसक्या

**नालासोपारा/प्रतिनिधी**

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत पेल्हार पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. शेजारील घरातील रहिवासी रामविलास पटेल याने पीडितेला (वय ९) आपल्या घरी बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचार करून अश्लील कृत्य केल्याची तक्रार फिर्यादीने पेल्हार पोलीस ठाण्यात दिली. ज्यावर अल्पवयीन छळ कायदा २०१२ च्या कलम ४,६,८,१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक कुमार गौरव धाडवड, योगेश देशमुख, संजय माशाळ, किरण आव्हाड, निखिल मंडलिक, दिलदार शेख यांच्या गटाने यश संपादन केले आहे. या गुन्ह्यात नाव असलेला आरोपी महाराष्ट्र राज्य सोडून उत्तर प्रदेशला गेला होता, मात्र तांत्रिक विश्लेषण व माहितीच्या मदतीने सदर गुन्हेगाराला कुर्ला, मुंबई येथून पकडण्यात आले आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्जुन पवार करीत आहेत.



# कोंकण विभागात मराठा आरक्षणाचे सर्वेक्षण शंभर टक्के पूर्ण!

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

महसूल यंत्रणेसोबत इतर विभागांच्या मदतीने कोकण विभागात मराठा आरक्षणाचे सर्वेक्षण शंभर टक्के पूर्ण झाले आहे. अशी माहिती कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याची मोहीम हाती घेतली होती. २३ जानेवारी पासून सुरु झालेल्या या मोहीमेत महसूल यंत्रणेसह इतर विभागांचे अधिकारी कर्मचारी सहभागी होते. अंगणवाडी सेविका, माध्यमिक आणि प्राथमीक शाळेचे शिक्षक, महानगरपालिकेचे कर्मचारी असे जवळपास साडेचार लाख प्रगनक महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या नियंत्रणात या मोहीमेसाठी राज्यभर काम करत होते. तर २०० हून अधिक डेटाबेस सेंटर सुरू होते. सर्वेक्षणासाठी खास सॉफ्टवेअरही तयार करण्यात आलं होत. ०२ फेब्रुवारीला मध्यरात्री बारा वाजता हे सर्वेक्षण संपल असून, कोकण विभागात हे सर्वेक्षण १०० टक्के पूर्ण झाल आहे. या सर्वेक्षणात संकलीत केलेली माहिती मागासवर्ग आयोगाकडे सादर करण्यात येईल. यावरून अहवाल तयार केला जाईल आणि तो शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

पान ८ वरून....

## तरुणाने छत्रपती शिवाजी महाराजांविषयी...

नव्हता. बोळींजचे पहिले सरपंच हे देखील मुस्लिम समाजाचे होते तर उपसरपंच हे भंडारी समाजाचे होते. तेव्हापासून येथील एकोपा कायम आहे. थोडक्यात सांगायचे झाले तर येथे दोन्ही समाजाचे स्थानिक नागरिक भावा-भावासारखे राहतात. मात्र बाहेरून कामानिमित्त येथे येत असलेल्या काही टुकार स्वभावाच्या व्यक्तींमुळे येथील एकात्मतेला तडा गेल्याचे स्थानिक मुस्लिम संस्थांचे मत आहे. याबाबत ठोस भूमिका घेत बोळींज मस्जीद ट्रस्ट व मुस्लिम जमातने सुफियान शेख व त्याच्या कुटुंबियांना मस्जीदमधील राहती खोली रिकामी करण्यास सांगितले असून सुफियानच्या कुटुंबियांची बोळींजमधून हकालपट्टी करण्यात आली आहे. येथे दोन्ही समाजाच्या बैठका पार पडल्या असून अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी पूरेपूर काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ॲड.आढाव पती-पत्नी हत्या प्रकरणी...

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांना निवेदन देण्यात आले. महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स ही संस्था ऑल इंडिया फेडरेशनशी जोडलेली आहे. ही संस्था महिला वकिलांची संस्था असून महिला वकील मुली व महिलासाठी कायद्याची जनजागृतीचे काम करत असते. यावेळी महाराष्ट्र वुमन फेडरेशनच्या अध्यक्षा ॲड.जयश्री पाटील, ॲड. किरण चिंते, ॲड. चारुशीला पाटील, ॲड. बबीता संकाये, लातूर जिल्ह्यातील महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन्स लॉयर्स चे महिला वकील सदस्या ॲड.संगीता ढगे, ॲड.प्रतिभा कुलकर्णी, ॲड.अरुणा वाघमारे, ॲड.गायत्री नल्ले, ॲड.वसुधा नाळापुरे, ॲड. रेहाना तांबोळी, ॲड. सविता दासे, ॲड.दीक्षा गवारे, ॲड.सलोनी डोके, ॲड.सरिता कांबळे, ॲड.मनीषा आनंदगावकर, ॲड.रेश्मा सय्यद, ॲड. सुप्रिया आटकरे, ॲड. रोहिणी वाघोलीकर, ॲड.शितल सोनकांबळे, ॲड.पल्लवी कुलकर्णी, ॲड. बिना कांबळे आदी महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## तरुणांनो शाहीरांनी लिहिलेले विचार...

यांचे या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले. यावेळी जिल्हा परिषद सदस्या विनया पाटील, भाजपचे युवा नेते समीर पाटील, प्रशांत पाटील, भावना पाटील, लोकशाहीर आत्माराम पाटील यांचे पुत्र संग्राम पाटील, प्रबोधिनीचे खजिनदार नागेश पाटील, पदाधिकारी यदुनाथ पाटील, बिपिन पाटील, दिगंबर देसाई, महाविद्यालयाचे पदाधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## दलित महिलेची जमीन शासकीय...

झाली आहेत, परंतु पीडिता दलित असल्याने सदर जमीन महिलेच्या नावे होत नसल्याचेही मीनाबाईंनी सांगितले आहे.दरम्यान नुकतेच भूमिलेख विभागाने कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देताच १ फेब्रुवारी रोजी जमीन मोजमापाची नोटीस काढून २ फेब्रुवारी रोजी अधिकारी मोजमापासाठी आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. तसेच जमीन बाळकवण्यासाठी काही समाज कंटकांनी सन २०११ मध्ये त्यांचे घर जाळून त्यांना पळवून लावण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी व पडघा मंडळ अधिकारी संतोष आगीवले यांनी आपसात संगनमताने हा सर्व कट रचत असल्याचा आरोप करीत मिनाबाईनी उपविभागीय कार्यालयासमोर बसून आमरण उपोषणासह आत्मदहनाचा ईशारा लेखी निवेदनाद्वारे दिला असून महसूल प्रशासनाने सदर जमीन त्यांच्या नावे करून मिनाबाईंनी न्यायाची आर्तहाक दिली संबंधित प्रशासनाला दिली आहे. विशेष म्हणजे नुकतेच हिवाळी अधिवेशनात दलित जमिनींवरील अतिक्रमण हटवू नये असे आदेश महसूल विभागाने पारित केलेले असताना हा सर्व प्रकार खळबळजनक असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच सन २०१५ मध्ये पाठवलेले अर्ज २०२४ मध्ये निकाली काढण्यात येते ही बाबही मनात संभ्रम निर्माण करणारी दिसून येत आहे. तर सद्यस्थितीत या सर्व घोटाळ्याची दखल जनसामान्यांसाठी लढणाऱ्या एस.जी लाईफ केअर फाउंडेशन या संस्थेने घेतली असून पीडित दलित महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वोतोपरी आंदोलनाच्या पावित्र्याचा ईशारा संस्थेचे संस्थापक दत्ता श्रीरंग गायसमुद्रे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिला आहे.

## आई-वडिलांच्या प्रेमाचा झरा कधीही...

श्री संत माणकोजी महाराज बोधले, छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज आदी महापुरुष आजही जिवंत आहेत असे अनेक दाखले व उदाहरण देऊन आपण आपल्या आई वडील यांची नियमित सेवा केली पाहिजे, कारण त्यांनी आपल्यासाठी जे कार्य केलेले आहे ते नाश न पावणारे आहे असे विवेचन केले. जो बाप आपल्या पाठीशी उभा असतो तोपर्यत कसलेही भय नसतं. ज्यांनी आपलं जीवन समाजसेवेसाठी वाहिलं ते समाजउपयोगी घडत असतात. जीवन संपल्यानंतर जे जगतात त्याला संत म्हणतात. आई-वडीलांसारखे मोठे दैवत नाही. गायीचे रक्षण करा अन् आई वडीलांची सेवा करा, तुमचे जीवन सुखी झाल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन करून देवाची प्राप्ती करण्यासाठी भक्ती लागते, तसेच प्रत्येकाला सुख पाहिजे असे वाटते. सुखासाठी तो प्रयत्न करतो, मुलांना सुख मिळावे असे फक्त आई वडील यांनाच वाटते. आई-वडिलांची इच्छा ही मुलांच्या सुखात भले पाहते, माणुस हा दुःखात असेल तर तो परमेश्वराजवळ राहतो, दुःखातच त्याला भगवंताची भक्ती घडते. सुख मिळाले तर त्याच्याकडुन भगवंताचे भजनही होत नाही. जर दुःख असेल तर त्याला भगवंताचा विसर पडत नाही. जीवनातील दुःख वजा व्हावे वाटत असेल तर देवाची प्राप्ती होणे गरजेचे आहे. प्रत्येक माणुस कोणत्या ना कोणत्या कारणाने दुःखी असतो. काही शारिरीक काही तण, मन, धनाने दुःखी असतो. प्रत्येक माणुस पैसा कमवितो परंतु त्याचा उपयोग घेत नाही. भारताची संस्कृती ही इतर देशांपेक्षा सुंदर असुन, भारतातील नागरीक ती संस्कृती विसरत चालला आहे. आपली संस्कृती प्रत्येकाने जपावी तेव्हाच भारत देश सुधारेल. घरातच आपल्या वृध्द आई वडिलांची मनोभावे सेवा करावी त्याच्यांच चरणात सर्व तिर्थक्षेत्र आहेत. त्यापेक्षा त्यांची सेवा म्हणजेच तिर्थक्षेत्र होय. यावेळी खांडगांव येथील प्रकाश नगर परिसरातील सरस्वती विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक चंद्रकात साळुंके सर, शशिकांत साळुंके, सुर्यकांत साळुंके व समस्त देशमुख (साळुंके) परिवारातील नातेवाईक व महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकर, प्रवचनकार, मृदगवादक, गायनाचार्य, टाळकरी, भजनी मंडळ, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खेळामुळे सांघिक भावना वाढीस...

श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. स्पर्धेत सहभागी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी खेळाचा आनंद घ्यावा. कर्मचाऱ्यांनी मनावरचा ताण कमी करुन खेळाचा आनंद घ्यावा. शारिरीक क्षमतांचा विकास करुन आणि आरोग्य सुदृढ राहण्यासाठी आनंदाने खेळात रममाण व्हावे, असा सल्ला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी दिला.प्रस्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन दाताळ यांनी केले. दहा तालुक्यातील अधिकारी-कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी विविध आकर्षक देखावे करत संचलन करण्यात आले. तसेच क्रीडा मशाल पेटवून स्पर्धेला प्रारंभ झाला. आभार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी यांनी मानले. सूत्रसंचालन संवादतज्ञ उध्दव फड यांनी केले.

## कुडुस येथे त्यागमुर्ती माता रमाई...

आयुनी. शारदाताई जाधव (चीखले), आयुनी. लीलाबाई जाधव (चीखले) आदी उपस्थित होते. तर बोधीवृक्ष छाया मंडळच्या सर्व महीला व पुरुष स्थानीक पदाधीकारी व विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संपुर्ण नियोजन व सूत्रसंचलन आयुनी. रश्मीताई भोईर (तालुका सरचीटणीस) यांनी केले.

# बारोळ येथे प्रेरणादायी व्याख्यान आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न




**देवणी/ प्रतिनिधी**

बोरोळ ता.देवनी येथे श्रीनाथ कोचिंग क्लासेसच्या १३व्या वर्धापन दिनानिमित्त प्रेरणादायी व्याख्यान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उदयगिरी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. कमलाकर गव्हाणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर उपस्थित होते. यावेळी क्लासेसच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला विविध स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपन्न केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मान्यवरांचे उपस्थित पार पडला यावेळी डॉ.कमलाकर गव्हाणे यांचे पालकांना व विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीनाथ कोचिंग क्लासेस चे संचालक राहुल बालुरे यांनी केले व तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित असलेले कै.रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जावळे व उपप्राचार्य शिवाजीराव सोनटक्के यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाबाबत मनोगत व्यक्त केले याप्रसंगी ग्रामपंचायत उपसरपंच प्रमोद पाटील देवनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य माधव बालूरे, दीपक पाटील, राजकुमार पाटील, कालिदास देवणे, ज्ञानेश्वर शेंडगे, निवृत्ती सूर्यवंशी इत्यादी मान्यवर उपस्थित होते या समारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणाचे सादरीकरण केले. गोविंदराव भोपणीकर यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करत कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल व प्रतिसादाबद्दल उपस्थिताचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तानाजी बालूरे आभार प्रदर्शन दत्ताभाऊ हुरूचनाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लक्ष्मण पवळे, भाग्यश्री पांचाळ, लक्ष्मण देवणे, पूजा गायकवाड, शेंडगे ताई इत्यादींनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाला विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडी शहरातील प्रलंबित कामां संदर्भात आमदार रईस शेख यांची जिल्हाधिकाऱ्यां सोबत बैठक संपन्न

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील आरोग्य,पिण्याचे पाणी व इतर नागरी समस्यांच्या सोडवणुकी साठी नुकताच रईस शेख यांनी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे बैठक आयोजित करण्याची मागणी केली होती. या अनुषंगाने नुकताच ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आमदार रईस शेख व जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत उर्दू घर निर्माण करण्यासाठी जागा निश्चित करणे, स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रूग्णालय दुरूस्तीसाठी २२ कोटी रुपयांचा निधी मिळावा, हे रुग्णालय २०० खाटांचे करावे, रूग्णालया मधील रूग्णवाहिका चौकशी करणे, रूग्णालयात असलेला डॉक्टर व कर्मचा-यांचा तुटवडा भरून काढण्यासाठी रिक्त पदे भरणे, भिवंडी उप जिल्हा रूग्णालय येथे नर्सिंग प्रशिक्षण विद्यालय व वस्तीगृह सुरू करावे, रुग्णालयात अत्याधुनिक ट्रामा केअर




सेंटर उभारणे, शहरातील वऱ्हाळदेवी तलावात सांडपाणी मिश्रित होत असल्यामूळे त्या ठिकाणी संरक्षक नाला बांधण्यात यावा, विविध सरकारी कार्यालयासाठी प्रशासकीय भवन निर्माण करावे, कामावरी नदीमधील प्रदूषण रोखण्यासाठी उपाय योजना व कार्यवाही व शास्त्रीनगर येथील कब्रस्थान अंतर्गत विविध सोयीसुविधा करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा व सांस्कृतिक भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करणे अशा विविध मागण्यांसंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीस पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, तहसीलदार अभिजित खोले या व्यतिरिक्त जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा शल्य चिकित्सक, महाराष्ट्र राज्य प्रदूषण मंडळ, कल्याण, रुग्णालयाचे अधीक्षक, जिल्हा नियोजन अधिकारी उपस्थित होते. ही बैठक चांगल्या वातावरणात होऊन अनेक प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लागतील अशी प्रतिक्रिया आमदार रईस शेख यांनी दिली आहे.

## नागतिर्थवाडी येथे प्लास्टिक मुक्ती जनजागरण रॅली



**देवणी/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागतिर्थवाडी यांच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमा अंतर्गत प्लास्टिक मुक्ती जनजागरण रॅली काढण्यात आली या रॅली मधून शालेय विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावात फिरून प्लास्टिक किती घातक आहे, दैनंदिन जीवनात प्लास्टिक वापर कसा टाळावा, पर्यायी व्यवस्था म्हणून प्लास्टिक ऐवजी इतर कोणकोणत्या वस्तू वापराव्यात, असलेले प्लास्टिक जतन करून त्याचा पुर्नवापर करन्यासाठी द्यावा हे समजावून सांगत गावभर घोषणा देवून जनजागृती केली. या वेळी गावचे सरपंच कोमल गुणाले, माजी सरपंच राज गुणाले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर कोंबडे, अंगणवाडी शिक्षिका पंचफुला गुणाले, शाळेच्या सहशिक्षिका अमरजा शिरुरे व गावातील नागरिक उपस्थित होते.

# भिवंडीत जय माता दी जनसेवा संस्था द्वारा भव्य माँ वैष्णोदेवी चौकी कार्यक्रमाचे आयोजन

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील जय माता दी जनसेवा संस्थेद्वारा नुकताच १५ व्या माँ वैष्णोदेवी चौकी या कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील श्री स्वामीनारायण मंदिराच्या प्रांगणात करण्यात आले होते. या प्रसंगी होमहवन पूजापाठ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर सुप्रसिद्ध भजन गायिका प्रीति पठानिया यांच्या भजन संध्या कार्यक्रमाने हजारो भाविक मंत्रमुग्ध झाले होते. याप्रसंगी दर्शनासाठी आमदार महेश चौघुले, माजी आमदार रूपेश म्हात्रे, भाजपा माजी अध्यक्ष संतोष शेट्टी, माजी नगरसेवक सुमित पाटिल, मयूरेश विलास पाटिल, जिजाऊ सामाजिक संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे, भिवंडी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख प्रसाद पाटिल, शिवसेना शहर प्रमुख सुभाष




माने, उद्योगपति साईनाथ पवार, कृष्णा गाजंगी, निजामपुरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड यांसह हजारोंच्या संख्येने भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. या निमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेत राम मंदिर, मां वैष्णोदेवी व राधा कृष्ण यांचे मनमोहक देखावे साकारण्यात आले होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे संस्थापक पराग मेहता यांनी केले. या निमित्त आयोजित महाप्रसादाचा लाभ तब्बल साडे सहा हजार भाविकांनी घेतला. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश कारेकर, प्रशांत जाधव, प्रशांत तन्ना, गणेश व्यास, जयकिशन चांगलानी, महेश कामीनवार, राकेश परदेशी, विजय तेजे, अक्षय पाठारी, पिंटू रायचा, भोला मंडल यांनी विशेष मेहनत घेतली.

## नागतिर्थवाडी येथे आरोग्य तपासणी शिबीर



**देवणी/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागतिर्थवाडी येथे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमा अंतर्गत तालुका आरोग्य यंत्रणेमार्फत शाळेतील विद्यार्थ्यांची व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्याच बरोबर मुलांना लठ्ठपणा, मधुमेह, दृष्टीदोष व जंत नाशक गोळ्यांचे महत्व सांगण्यात आले. मुलांना दैनंदिन जीवनात स्वच्छतेचे, पूरक आहार याचे महत्व व हात धुण्याचे प्रात्याक्षिक करून दाखवण्यात आले. यावेळी आरोग्य विभाग प्राथमिक आरोग्य केंद्र नागराळ येथील वैद्यकीय अधिकारी बिलाला मिर्जा, आरोग्य पर्यवेक्षक हरिशचंद्र गायकवाड, आरोग्य सेविका वर्षा सुरसे, लॅब टेक्निशियन सुर्यवंशी, अमोल रोटटे यांच्या सह गावचे माजी सरपंच राज गुणाले, सहशिक्षिका अमरजा शिरुरे व गावातील नागरिक उपस्थित होते.

## नायगावच्या रेती बंदरात आढळला मानवी हाडांचा सापळा





**वसई/प्रतिनिधी**

नायगाव पूर्वेच्या रेती बंदराजवळ मानवी हाडांचा सापळा आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. कवटी आणि हाडे वेगवेगळ्या ठिकाणी होती. पोलिसांनी हाडांची जुळवाजुळव करून न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवले आहे. हाडांचा सापळा असल्याने तो पुरुषाचा आहे की महिलेचा ते स्पष्ट झालेले नाही. नायगाव पूर्वेला रेतीबंदर असून तेथे तिवरांची झाडे आहेत. रविवारी सकाळी लघुशंकेसाठी गेलेल्या एका इसमाला झुडपात एक मानवी कवटी आढळून आली. त्याच्याच काही अंतरावर हाडांचा सापळा आढळला. त्याने तत्काळ याबाबत नायगाव पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी हाडांचे अवशेष गोळा केले असून ते न्यायवैद्यक चाचणीसाठी पाठवले आहेत. अहवालानंतर हत्या आहे की अपघाती मृत्यू ते स्पष्ट होईल, अशी माहिती नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रमेश धायगुडे यांनी दिली आहे. सध्या पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे.

## राज्यस्तरीय कला महोत्सवात अब्दुल रहीम मोहम्मद अमोदीचे यश

**देवणी/प्रतिनिधी**



औरंगाबाद येथील यशवंत कला महाविद्यालयातर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कला महोत्सव २०२४ स्पर्धेसाठी औरंगाबाद मधील शहागंज येथील महाराष्ट्र हिंदी विद्यालय मधील इयत्ता सातवी चा विद्यार्थी अब्दुल रहीम मोहम्मद अमोदी यांनी अतिशय उत्कृष्टपणे निसर्ग चित्रे रेखाटून विद्यालयात तृतीय क्रमांक येण्याचा मान पटकावला आहे. याबद्दल त्याला बक्षीस व प्रशस्तीपत्र मिळाली आहे. सदर स्पर्धेसाठी निसर्ग चित्रे, निसर्ग रम्य शाळा,आमची शाळा सुंदर शाळा आदी विषय ठेवण्यात आले होते. अब्दुल रहीम याला शाळेचे कलाशिक्षक सोपान करवंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या या कलाकृती बद्दल संस्थेचे सचिव डॉ नारायण वाकळे, मुख्याध्यापक रवींद्र तायडे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक किरण पवार, प्रवेक्षक योगेश निकम, शिक्षक प्रतिनिधी शुभांगी दसपुते, वर्गशिक्षक गोविंद गायकवाड यांच्यासह शाळेतील कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहेत.

## नवघर माणिकपूर मधील फेरीवाल्यांवर कारवाई

**वसई/प्रतिनिधी**



वसई विरार शहर महापालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती एच, नवघर माणिकपूर अंतर्गत वसई रोड रेल्वे स्टेशन लगत १५० मीटर मधील व बाहेरील अनधिकृत फेरीवाल्यांचा मोठ्या प्रमाणात परिसरात बसून मज्जाव करित असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या नागरीकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी दाखल होत्या. येथील आनंद नगर परिसरातील रुग्णालयात रुग्णवाहीका वेळेत पोहचू शकत नसल्याने व आणीबाणीच्या वेळी अग्निशमन विभागाची वाहने सदर परिसरात ने आन करण्यासाठी अडथळा निर्माण झाला होता. दैनंदिन सदरील परिसरात बसत असलेल्या सर्व अनधिकृत फेरीवाल्यांवर महानगरपालिकेचे उप-आयुक्त. विजयकुमार व्दासे साहेब, तसेच सहा. आयुक्त निलेश म्हात्रे, अतिक्रमण विभाग प्रमुख संजय पाटील तसेच माणिकपूर पोलीस ठाणे व वाहतूक विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमानाने कारवाई करुन सर्व परिसर रहदारीस मोकळा केलेला असल्याने आनंद नगर परिसरातील नगारीक व व्यापारी यांनी महानगरपालिकेच्या व पोलीस प्रशासनामार्फत अनधिकृत फेरीवाल्यांवर केलेल्या कारवाई करुन आम्हाला न्याय दिल्याबाबतचे पत्र दोन्ही विभागाला देऊन त्यांचे आभार मानले आहे.

## वसई तालुका बार असोसिएशनची महिला क्रिकेट टीम पोहोचली सेमी फायनलपर्यंत!



**वसई/प्रतिनिधी**

वसई तालुका बार असोसिएशन वसई कोर्टाच्या महिला क्रिकेट टीमने अखिल महाराष्ट्र महिला क्रिकेट टुर्नामेंट मुंबई (पारसी जिमखाना) येथे भाग घेतला होता. सदर क्रिकेट टुर्नामेंट मध्ये वसई तालुका बार असोसिएशनची टीमने पहिल्यांदाच भाग घेतलेला होता. तरीही सदर टीमने सेमी फायनल पर्यंत मजल मारली होती. सदर टीमची नवखी कप्तान ॲड. पूनम जाधव पाटील ह्या होत्या आणि त्यांनी त्यांच्या सुंदर नेतृत्वाचे प्रदर्शन करताना सदर टीमची मजल सेमी फायनलपर्यंत मारली होती. सदर टीमचे प्रशिक्षक सीनिअर वकील आणि उत्कृष्ट क्रिकेटर ॲड. आनंद घरत हे आहेत त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने महिलांना क्रिकेट चे प्रशिक्षण दिले. सदर महिलांच्या क्रिकेट टीममध्ये पुढील प्रमाणे महिला वकील होत्या. ॲड. पूनम जाधव पाटील (कॅप्टन), ॲड. मयुरी पाटील, ॲड. माधुरी बेलसरे, ॲड. सरिता यादव, ॲड. प्रियांका म्हात्रे, ॲड. वंदना पटेल, ॲड. पूजा पाटील, ॲड. उर्मिला परेरा, ॲड. सबीया काझी, ॲड. काजल पाटील, ॲड. संपदा राऊत, ॲड. रुचिता सामंत, ॲड. गार्गी घरत, ॲड. स्मिता घायवट, ॲड. रीना चौरसीया, ॲड. रुपाली पाटील या सर्व महिला वकिलांचे खूप खूप अभिनंदन. सदर टीमसाठी वसई तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. परमानंद ओझा ह्यांचे आशिर्वाद लाभले.

# वाड्यातील शिवराज दुबेले ठरला सुवर्ण पदकाचा मानकरी

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील मोहोट्याचापाडा येथील रहिवासी असलेला विद्यार्थी शिवराज अनंता दुबेले हा युनिवर्सिटी ऑफ मुंबई लॉ अक्ॅडेमी येथे एल.एल.बी.चे शिक्षण घेत असून त्याने विधी विद्या विभागात कॉन्सस्टीट्यूशनल लॉ या विषयात सर्वाधिक गुण मिळवून मुंबई विद्यापीठात प्रथम आल्याने तो सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला आहे. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल रमेश बैस, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील,पद्मभूषण राम नाईक, डॉ.जगदीश कुमार व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुळकर्णी यांच्या शुभ हस्ते बुधवारी (दि.७ फेब्रुवारी) कावजी जहांगीर सभागृह, युनिवर्सिटी ऑफ मुंबई, फोर्ट येथे आयोजित केलेल्या २०२३ च्या



दीक्षान्त समारंभात शिवराज दुबेले यांस सुवर्ण पदक व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या ध्येयपूर्तीसाठी अंगी जिद्द बाळगली आणि कठोर परिश्रम घेतले तर उत्तुंग गरुड झेप घेता येते हे वाडा तालुक्यातील मोहोट्याचापाडा या खेडेगावातील शिवराज दुबेले याने दाखवून दिले आहे. शिवराज हा युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई लॉ अ‍ॅकॅडमी येथे एल. एल.बी.चे शिक्षण घेत असून त्याने विधी विद्या विभागात घटनात्मक कायदा (कॉन्सस्टीट्यूशनल लॉ) या विषयात सर्वाधिक गुण मिळवून मुंबई विद्यापीठात प्रथम येवून तो सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला आहे. शिवराज दूबेले हा या क्षेत्रातील ठाणे व पालघर जिल्ह्यातील सुवर्ण पदकाचा मानकरी ठरलेला पहिलाच विद्यार्थी असून आपल्या या घवघवीत यशाचे श्रेय तो आई वडिलांना देतो, कारण सतत प्रोत्साहन आणि प्रेरणा देणाऱ्या माझ्या पालकांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे शिवराजने सांगितले. वाडा या दुर्गम भागातील तालुक्याची देखील शान वाढविली आहे.त्याच्या या चमकदार कामगीरीचे सर्वच स्तरातून कौतुक होत असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सकारात्मक दृष्टीकोन ठेवल्यास यश हमखास; मार्गदर्शन शिबिरात सल्ला

**वसई/प्रतिनिधी**

अभ्यासाला कल्पकतेची जोड द्या. वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांचे स्वरूप समजून तसा अभ्यास करा. वेळेचे नियोजन आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन अभ्यास केल्यास यश हमखास मिळेल, असा विश्वास वसईचे तहसीलदार डॉ.अविनाश कोष्टी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिला. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व एसपी ज्युनिअर कॉलेज, जूचंद्र आणि सह्याद्री शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. त्या वेळी ते बोलत होते. याप्रसंगी नायगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रमेश भामे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भामे यांनी आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर करिअर घडू शकतो. मात्र त्यासाठी आपण आपल्या क्षमता ओळखल्या पाहिजेत, असे विद्यार्थ्यांना सांगितले. त्याचबरोबर त्यांनी खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधीच्या उपलब्धतेबद्दलही विद्यार्थ्यांना माहिती दिली. व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन स्वराज्य प्रतिष्ठान, जुचंद्र या संस्थेमार्फत करण्यात आलेले होते. कार्यक्रमासाठी सह्याद्री शिक्षण संस्था व स्वराज्य प्रतिष्ठान यांनी या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते.

# 'ड्रंक अँड ड्राईव्ह' प्रतिबंधात्मक मोहीम; ३३९ वाहनचालकांची तपासणी

**मुंबई/प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विविध उपक्रम राज्यभरात राबविण्यात येत आहे. रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती करण्यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेसंदर्भात मार्गदर्शनही करण्यात येत आहे. दारू पिऊन नशेच्या अंमलाखाली वाहने चालविली जाऊ नयेत, अपघातांची व अपघाती मृत्यूंची रोखणे या उद्देशाने अशा वाहनचालकांची ब्रेथलायझर उपकरणाद्वारे तपासणी करण्याकरीता ड्रंक अँड ड्राईव्ह प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात आली. यामध्ये ३३९ वाहनचालकांची ब्रेथलायझर उपकरणाद्वारे तपासणी करण्यात आली. या मोहिमे अंतर्गत आरटीओ व वाहतूक विभागातील अधिकारी यांनी सायन सर्कल, सुमन नगर चौक, एडवर्ड नगर, अमर महल चौक चेंबूर, एलबीएस रोड घाटकोपर, विक्रोळी, देवनार, मानखुर्द शिवाजी नगर चौक आदी ठिकाणी वाहनचालकांची ब्रेथलायझर उपकरणाद्वारे तपासणी करण्यात आली. ही मोहिम ३ ते ५ फेब्रुवारी दरम्यान सायं ७ ते रात्री ११.३० या दरम्यान राबविण्यात आली. यावेळी दुचाकी, ऑटोरिक्षा, टॅक्सी, मालवाहतूक करणारे हलके वाहन, अवजड वाहन व बसचालकांची तपासणी करण्यात आली. दारू पिऊन वाहने चालविल्यास निश्चितपणे अपघात होऊन मृत्यूमुखी पडण्याची सर्वात जास्त शक्यता असल्याने वाहनचालकांनी नशेच्या अंमलाखाली वाहने चालवू नयेत. पुढील काळातही ब्रेथलायझर उपकरणाद्वारे



तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी दारूच्या अंमलाखाली वाहने चालवू नये, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय अहीरे यांनी केले आहे.

12 TO 18 FEBRUARY 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 2/10/2024 8:33 PM Page 1



# तरुणाने छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याने तणावाचे वातावरण!

## ● अर्नाळा सागरी पोलिसांच्या मध्यस्तीने परिस्थिती आटोक्यात ● बोळींज मुस्लिम ट्रस्टची समजूतदारपणाची भूमिका!




**विरार/प्रतिनिधी**

बोळींजमधील सुफियान शेख नामक मुस्लिम युवकाने छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याचे निर्दशनास आल्यानंतर स्थानिक गावकजयांनी रविवारी आक्रामक भूमिका घेत सदर युवकावर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्याच्या मागणीसाठी बोळींज नाक्यावर चक्काजाम केला होता. येथील भंडारी समाजाचे अध्यक्ष महेश राऊत यांनी प्रथमतः ही बाब स्थानिक नागरिकांच्या लक्षात आणली. यानंतर भंडारी समाजाबरोबरच आगरी व सामवेदी ब्राह्मण समाजाच्या स्थानिक लोकांनी एकत्र येऊन आक्रामक भूमिका घेत सुफियान शेख याच्या वडिलांच्या मटणाच्या दुकानावर धावा बोलत तोडफोड केली. तसेच सुफियानवर गुन्हा दाखल करून त्वरीत अटक करावी या मागणीसाठी हजारो हिंदु कार्यकर्ते बोळींज नाक्यावर जमा झाले होते. विशेष म्हणजे या कार्यकर्त्यांमध्ये सर्वपक्षीय हिंदुंचा सहभाग होता. बहुजन विकास आघाडीच्या स्थानिक कार्यकर्त्यांबरोबरच शिवसेनेचे जितेंद्र राऊत, मनसेचे आनंद काळे, युवानेता दीपक म्हात्रे, भाजपाचे हितेश म्हात्रे हेदेखील घटनास्थळी हजर झाले. महिलांचाही यात मोठ्या संख्येने सहभाग होता. त्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलीस उपनिरीक्षक रणजितसिंह परदेशी यांनी आंदोलनकर्त्यांपैकी एका गटाला पोलीस ठाण्यात येऊन रितसर गुन्हा दाखल करण्यास सांगितले. मात्र प्रकरण फारच गंभीर असल्याचे लक्षात येताच त्यांनी याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पाटील यांच्या सल्ल्यानुसार सुफियान शेख याच्यावर भादंवि २९५अ, २९८, ५०५ (१)(क), माहिती व तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६७ अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यामुळे परिस्थिती आटोक्यात आली. त्यानंतर सलग दोन दिवस बोळींजमध्ये तणाव जाणवत होता. मात्र आता हा तणाव पूर्णपणे निवळला असून पुन्हा अशाप्रकारचे कांड होऊ नयेत म्हणून पाच जणांच्या एका कमिटीची स्थापना गावपातळीवर करण्यात आली आहे. या कमिटीच्या माध्यमातून या प्रकरणाच्या पुढील कायदेशीर प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यात येणार असून हिंदुविरोधी कारवायांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. तसेच पुन्हा अशा घटनांची पुनरावृत्ती न होता गावात शांतता नांदावी यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

**हिंदु-मुस्लिम ऐक्य बोळींजचे वैशिष्ट्य**

बोळींज गावात अनेक पिढ्यांपासून हिंदु-मुस्लिम या दोन्ही समाजांचे वास्तव्य आहे. मात्र आजतागायत केव्हाही असा कोणताही प्रकार घडला ...पान ६ वर

# ॲड.आढाव पती-पत्नी हत्या प्रकरणी आरोपींवर तात्काळ कठोर कारवाई करावी -ॲड.जयश्री पाटील



**लातूर/प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथील ॲड. राजाराम जयवंत आढाव या पती-पत्नींची निर्घृण हत्या तसेच लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील वलांडी येथील सात वर्षीय बालिकेवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी दोषी आरोपींवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र वुमन फेडरेशनच्या अध्यक्षा ॲड.जयश्री पाटील यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडे केली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथील ॲड.राजाराम जयवंत आढाव पती व ॲड.मनीषा राजाराम आढाव पत्नी या वकिल दाम्पत्यांची अमानुषपणे हत्या करण्यात आली. न्याय व हक्क यासाठी काम करणारे वकील त्यांचीच हत्या होणे हे अत्यंत दुर्दैवी व क्रूर घटना आहे. या प्रकरणी गुन्हेगाराला कठोर शासन करावे व वकिल संरक्षण कायदा पास करावा. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यात वलांडी या गावात माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. एका नराधमाने सात वर्षीय लहान मुलीवर लैंगिक अत्याचार केला आहे. ही घटना अतिशय वाईट आहे. असे कुकृत्य करणाऱ्या नराधम आरोपीला शासनाने कठोर शासन करावे व अशा घटना पुढे घडणार नाहीत, यासाठी त्याला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी ॲड.जयश्री पाटील यांनी केली आहे. आपल्या मागणीचे निवेदन ...पान ६ वर

# वळसंग टोल प्लाजा येथे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

वलसंग टोल येथे ३५ वा रस्ता सुरक्षा अभियान या निमित्ताने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण अंतर्गत जी. आर. अक्कलकोट सोलापूर हायवे प्रोजेफ्ट कडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, म्हणून सोलापूर जिल्हयाचे जिल्हा आधिकारी कुमार आशीर्वाद, भा.रा.रा.प्रा झखण सोलापूरचे प्रकल्प संचालक संजय कदम सो व अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यमावरसो. (डी.वाय.एस. पी), भा.रा.रा.प्रा. सोलापूर उप प्रबंधक टेक्निकल या अमित पाण्डेय, तसेच वळसंग पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले. व भा.रा.रा.प्राचे. महेश येमूल तसेच अनिल विपत उपस्थीत होते. जी आर अक्कलकोट सोलापूर हायवेचे प्रोजेक्ट मैनेजर मणि भूषण यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला व सूत्रसंचालन अनिल विपत यांनी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतीश आण्णा सुरवसे. व पत्रकार मित्र बंधू यांच्या उपस्थितीता हा कार्यक्रम नियोजनबद्ध पार पडला. यामध्ये. प्रामुख्याने रस्ता सुरक्षा अंतर्गत. हायवेवरील गाड्यांना. रेडियम लावणे तसेचा नेत्र तपासणी शिबीर, रक्तदान शिबीर याचे आयोजन करण्यात आले होते. त्यास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. रस्ता सुरक्षिततेच्या नियमांचे घोषण करून प्रतिज्ञा घेण्यात आली. त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी अपघात ग्रस्तांना तातडीने मदत करण्याचे आवाहन केले. सक्तीने हेल्मेटचा वापर करा असे आवाहन उध्दझ यामावर सर यांनी केले. कदम सर यांनी महामार्गावर विरुद्ध दिशेने वाहने चालवू नका व वाहने सावकाश चालविण्यास सांगितले. आपली काळजी आपण स्वतः घ्यावी हे नियम आपल्या स्वतःसाठी आहेत लोकांना दाखवण्यासाठी नाही. घरी आपली कोणीतरी वाट बघत आहे आपली सुरक्षा आपण करावी असे मणि भूषण सर म्हणाले. यामध्ये घेण्यात आलेले रक्तदान व नेत्र तपासणी शिबिर हे अश्विनी मेडिकल महाविद्यालय व संशोधन केंद्र यांच्या मार्फत घेण्यात आले होते.

# तरुणांनो शाहीरांनी लिहिलेले विचार आचरणात आणा -ज्ञानेश महाराव




**पालघर/प्रतिनिधी**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्रमुख योगदान दिलेले लोकशाहीर आत्माराम पाटील, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, लोकशाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांनी लिहिलेली शाहिरी गीते ही आजच्या तरुणांनी वाचावीत आणि त्यांचे विचार आचरणात आणावेत असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार आणि नाटककार ज्ञानेश महाराव यांनी केले. लोकशाहीर आत्माराम पाटील कला प्रबोधिनी आणि मराठी विभाग सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळी पालघर आयोजित लोकशाहीर आत्माराम पाटील जन्ममहोत्सव कार्यक्रम २०२४ निमित्त जाहीर व्याख्यान आणि पोवाडे गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर येथे दांडेकर शिक्षण मंडळीचे अध्यक्ष सचिन कोरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि ज्ञानेश महाराव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्ञानेश महाराव यांनी लोकशाहीर आत्माराम पाटील यांच्या जीवनाचे विविध पैलू उलगडले. आत्माराम पाटील यांनी रचलेले पोवाडे, कवने, गीते यांचे दाखले देऊन शाहीर आत्माराम पाटील यांनी आपल्या रचनेतून समाज प्रबोधनाचे काम कसे केले हे आपल्या खास शैलीतून मांडले. खरा शाहीर हा मातीशी आपले नाते जोडणारा असतो, त्यामुळे खरे शाहीर ओळखायला शिका,खरे शाहीर हे कोणापुढे लाचार होत नाहीत, असे परखड मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन कोरे यांनी देखील असा कार्यक्रम हा महाविद्यालयात होत असल्यामुळे आनंद व्यक्त केला आणि शाहिरीचे महत्व अधोरेखित केले. ज्ञानेश महाराव यांनी स्वतः यावेळी लोकशाहीर आत्माराम पाटील यांच्या काही पोवाड्यांचे सादरीकरण यावेळी केले. आत्माराम पाटील यांच्या पत्नी ज्येष्ठ शाहीर इंद्रायणी पाटील, प्रबोधिनी चे अध्यक्ष शाहीर गंगाराम घरत यांनीही पोवाडा सादर केला. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष रमाकांत पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले, तर सचिव विनोद पाटील यांनी आभार व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राध्यापक विवेक कूडू, संगीता मोरे, प्रकाश घरत ...पान ६ वर

# दलित महिलेची जमीन शासकीय अधिकाऱ्यांचा बळकावण्याचा प्रयत्न; पीडितेचा आत्मदहनाचा इशारा



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील कुकसे-भोईरगाव हद्दीतील ६९ वर्षीय दलित महिला गेल्या दोन पिढ्यांपासून वडिलोपार्जित जमीन पतीसह कसत असलेली कब्जावहिवाटीची जमीन शासकीय अधिकारी आपसात संगनमताने साटेलोटे करून बळकवण्याचा प्रयत्न करीत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे पीडित वृद्ध महिलेने शासनाला आत्मदहनाचा ईशारा सामाजिक माध्यमातून दिला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, तलाठी सजा अर्जुनली हद्दीतील भोईरगाव येथील स.नं.१५,१६ जुना ५८ व ५७ आणि मौजे कुकसे येथील ५/१/अ, ५/२ व जुना ५९/१,२ अशी एकूण साडे पाच एकर जमीन मूळ मालक मंगलदास दामोदर ठक्कर यांच्या मालकीची आहे. परंतु त्यांनी राजीनामा दिल्यानंतर सदर जमीन वाडवडिलांपासून भिमराव गणपत सोष्टे यांच्या नावावर आहे. आणि गत दोन पिढ्यापासून ते पत्नी मिनाबाई सोष्टे यांच्यासोबत कसत आहेत. यासह तलाठी दप्तरी पिक पाणीही त्यांच्या नावाची नोंद आहे. दरम्यान ३४ वर्षापासून पीडित दलित महिला मीनाबाई सदर जमीनीचा ७/१२ नावावर करण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करून प्रयत्न करीत आहेत. मात्र शासनाचे अधिकारी आर्थिक साटेलोटे करून सदर जमीन विकासकांच्या घश्यात घालण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर आरोप मिनाबाई यांनी केला असून याच जमिनीतील पोटहिस्से अन्य दोन व्यक्तींच्या नावे ...पान ६ वर

# आई-वडिलांच्या प्रेमाचा झरा कधीही आटत नसतो -अमोलजी महाराज बोधले



**लातूर/प्रतिनिधी**

आपल्या मुलांच्या सुख-समाधानासाठी देह झिजवणाऱ्या आई-वडिलांच्या प्रेमाचा झरा कधीही आटत नसतो. त्यांचे आर्शीवाद सदोदीत आपल्या पाठीशी असतात, तेंव्हा प्रत्येकांनी आपल्या आई-वडिलांची सेवा करून पुण्यवान बनावे असा हितोपदेश श्री संत मानकोजी महाराज बोधले यांचे वंशज ह.भ.प. भागवताचार्य अमोल महाराज बोधले यांनी खांडगाव येथील कीर्तनरुपी सेवेत बोलत असताना केला. ह.भ.प. भागवताचार्य अमोल महाराज बोधले यांनी भावबळी विष्णुदास । नाही नाश पावत ।। या अभंगावर चिंतन करताना म्हणाले की, खरा विष्णुदास कोण, तो कसा नाश पावत नाही, जरी तो शरीराने नाश पावला तरी किर्तीरुपाने, कार्यरुपाने जिवंत राहतो. श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत तुकोबाराय, ...पान ६ वर

# खेळामुळे सांघिक भावना वाढीस लागते - जिल्हाधिकारी



**लातूर/प्रतिनिधी**

शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी नियमितपणे विविध क्रीडा स्पर्धा होणे आवश्यक आहे. अशा स्पर्धांमुळे अधिकारी व कर्मचारी एकत्रित आल्याने सांघिक भावना वाढीस लागते. शासनाने सोपविलेली जबाबदारी पार पाडणे आणि कार्यालयीन कामकाज सांघिकपणे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये आयोजित जिल्हा परिषद क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन दाताळ, दत्तात्रय गिरी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अप्पासाहेब चाटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हणमंत वडगावे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, कृषी विकास अधिकारी सुभाष चोले, कार्यकारी अभियंता अभय देशपांडे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, गट विकास अधिकारी व जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. दैनंदिन कामकाज करताना अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी एखादा आवडीचा खेळ खेळायला हवा. निरोगी आयुष्य जगण्याची गुरूकिल्ली असून खेळामुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी ...पान ६ वर

# ओल्या कचऱ्या पासून गांडूळ खत निर्मितीचा स्तुत्य उपक्रम




**वाडा/प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियान ४.० घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्याच्यापासून खत तयार करण्याच्या स्तुत्य उपक्रम खानिवली ग्रामपंचायतीने ९ फेब्रुवारीपासून राबविण्यास सुरुवात केली आहे. कचऱ्यापासून सेंद्रिय खत तयार करण्यासाठी सुरुवात करण्यात आली असून अश्या प्रकारे सेंद्रिय खत तयार करणारी खानिवली ग्रामपंचायत ही तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत आहे. किचन मधून निघणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत तयार करने व घरातून निघणारा प्लॅस्टिकचा कचरा हा लोखंडी हुकाला टांगून ठेवणे या बाबत उपस्थित महिलांना माहिती देण्यात आल.यावेळी सरपंच भरत हजारे, सदस्य प्रेरणा पोटींदा,सदस्य सारिका पाटील, ग्रामसेवक, पंकज चौधरी, पुणे येथील इनोरा बायोटेक प्रा.लि.या कंपनीचे विजय भालेराव ग्रा.पं.कर्मचारी व बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.

# अयोध्या ताई भोपळे यांची आझाद आदिवासी कोळी सा.सं.च्या लातुर जिल्हाध्यक्षपदी निवड



**लातूर/प्रतिनिधी**

कोळी समाजातील आपली योग्यता, प्रतिष्ठा व समाजाप्रती असलेली तळमळ व सामाजिक कार्याची दखल घेऊन आझाद आदिवासी कोळी सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष आदरणीय नरसिंग आयलेवाड, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष परमेश्वर पाटील भिमलवाड व युवा प्रदेशाध्यक्ष सुनिल पिलेवाड यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत सौ. अयोध्या ताई भोपळे यांची आझाद आदिवासी कोळी सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य च्या महिला आघाडी लातुर जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. या बैठकीला मार्गदर्शन करताना प्रदेशाध्यक्ष परमेश्वर पाटील भिमलवाड यांनी संघटनेच्या विविध कार्यावर प्रकाश टाकला. तसेच अयोध्या ताई भोपळे यांना देण्यात आलेल्या पदाचा उपयोग त्या समाजाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी करतील तसेच आपल्या कार्य क्षेत्रात आझाद आदिवासी कोळी सामाजिक संघटनेचे महाराष्ट्रभर जाळे उभे करातील असा विश्वास असल्याचे या वेळी बोलुन दाखविले आहे. यावेळी नांदेड जिल्हा अध्यक्ष विकी जुंगुलवाड, लातुर जिल्हा संपर्कप्रमुख धनराज हांदिखेरे, लातुर जिल्हाध्यक्ष अंकुश इंगळवाड, प्रकाश कुरेवाड, अंकुश जंपावाड, सिद्धेश्वर बोईनवाड, सुधाकर बसवणे, राम नाचेबोणे, खंडु देवमाने, संजिवनी वजिरे, सुरेखा वजिरे, समर्थ वजिरे, ओम वजिरे, अशोक इर्ले, शिवम चिलकेवाड, मिनाक्षी बेसके, बालाजी येणकुरे, पवनकुमार भोपळे, पवनकुमार पुट्टेवाड, संगीता ताई धुमाळ, वनिता ताई कोळी, मारोती भोपळे, राजकुमार पिटले यांनी अयोध्या ताई भोपळे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. दरम्यान मौजे उजळंब येथील आदिवासी कोळी समाज बांधवांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन जिल्हाध्यक्ष अयोध्या ताई भोपळे यांचे स्वागत केले. यावेळी श्रीमती गंगुबाई भोपळे, गयाबाई बोईनवाड, लक्ष्मीबाई बोईनवाड, महानंदाबाई भोपळे, अहिल्याबाई कारले, सावित्रीबाई पिटले, त्रिवणाबाई भोपळे, सारजाबाई निलेवाड, सावित्रीबाई भोपळे, रईवताबाई भोपळे, शांताबाई वाडकर इत्यादी समाज बांधव उपस्थित होते.

# कुडुस येथे त्यागमुर्ती माता रमाई जयंती ऊत्साहात साजरी



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील कुडुस येथे भारतीय बौद्ध महासभा वाडा तालुका शाखेच्या वतीने आणि बोधीवृक्ष छाया मंडळ, कुडुस यांच्या संयुक्त विद्यमाने त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. रमाई आंबेडकर नगर समाज हॉल येथे तालुका महीला अध्यक्ष आयुनी. करुणाताई जाधव यांच्या अध्यक्षतेखाली त्यागमूर्ती माता रमाई यांची १२६ वी जयंती साजरी करण्यात झाली. माता रमाई जयंतिउत्सवासाठी पालघर जिल्हा वाडा तालुका पदाधिकारी तसेंच धम्म उपासक, उपासिका आदरणीय नारायण जाधव गुरुजी (जिल्हा, संस्कार सचीव), आयुनी. मंदाताई कांबळे (जिल्हा, महीला संघटक), आयुनी. सीमाताई महाले (तालुका कोषाध्यक्ष), आयुनी. अपर्णाताई गवळी (उपाध्यक्ष, संस्कार विभाग), आयुनी. कविता ताई जाधव (महीला पर्यटन सचीव), आयुनी. निशाताई वाघचौरे (महीला संरक्षण सचीव), आयुनी. वैभवीताई जाधव (महीला संस्कार सचीव), ...पान ६ वर